।। श्री स्वामी समर्थाय नमः ।।

# ।। श्री मारुती नवशती ।।

वैद्य गणेश लक्ष्मणराव शिंदे
(B.A.M.S.)

मनकर्णिका पब्लिकेशन

**अनुक्रमणिका**


| अध्याय | अध्यायाचे नाव | पृष्ठ |
|---|---|---|
| पहिला | स्तंभनाध्याय | |
| दुसरा | विद्वेषणाध्याय | |
| तिसरा | उच्चाटनाध्याय | |
| चवथा | वशीकरणाध्याय | |
| पाचवा | मोहनाध्याय | |
| सहावा | संजिवनाध्याय | |
| सातवा | राजवशीकरणाध्याय | |
| आठवा | रोगनिवारक सर्व उपद्रवशांती अध्याय | |
| नववा | ब्रह्मांडनायक अध्याय | |

## ।। स्तंभनाध्याय ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सीतापतये नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री हनुमते नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

नमन माझे तुज गणपती। विद्यादाता तू वाचस्पती। द्यावी द्यावी रे मज मती। लिहिण्या श्रीमारुती नवशती।।१।। गजानन तव कृपा होता। काय अशक्य तुझे भक्ता। तव वरदानेची साकारे आता। ही श्री मारुती नवशती।।२।। आता नमीन वागीश्वरी। वाणी विद्या अक्षरेश्वरी। करी कृपा तव भक्तावरी। असावे माते तव वरदान।।३।। असशी तूची स्फुरणकर्ती। प्रेरणा तूची तूच मती। शब्दैश्वर्ये व्हावे प्रकटी। या श्रीमारुती नवशतीत।।४।। नमीन श्रीस्वामी माऊली। जी करी सदा कृपासावली। तारी भक्ता ही प्रेमस्वरुपी। घडवी भक्तांचे प्रारब्ध।।५।। तयांनीच मज प्रेरणा देऊनी। तैसेची सकळ सामर्थ्येनी। गणेशास या स्फुरण करवूनी। दिधली हाती लेखणी।।६।। तयांचे कृपे करी हे धाडस। म्हणतो वर्णावे मारुती चरीत्र। प्राणदेवता जो हा प्रत्यक्ष। सामर्थ्य कैसे मी वर्णावे।।७।। रामाचे नाम घेता मुखी। होतसे प्रसन्न मारुती। नाचे आनंदे भक्तांगणी। ऐसा अद्वितीय हा भक्त।।८।। म्हणती हा

असे रुद्रावतार। सप्तांमधील एक चिरंजीव। दंग रामनामी निरंतर। लीन सदा श्रीराम चरणी।।९।। भक्त भगवंत हे एकच रुप। परी हा असे द्वंद्वं समास। द्वंद्वातूनच साधे अद्वैत। ऐसे अनोखे वैशिष्टय याचे।।१०।। आहे हनुमंत चिरंजीव। असे सर्वत्र तयाचा संचार। अस्तिव त्याचे निरंतर। जाणवे तयाच्या भक्तांसी।।११।। चाले जेथे रामकथा गायन। अथवा वाचती रामायण। ऐकण्या रामनामाचा गजर। आनंदे राही हा उपस्थित।।१२।। मांडती तेथे त्याचेसाठी पाट। येवोनी बैसे तेथे हनुमंत। करुनी रामकथेचे श्रवण। जाई निघोनी निजस्थानी।।१३।। कृत, त्रेता, द्वापार, कलीयुग। ऐसी असती युगे चार। त्रेतायुगामाजी श्रीरामावतार। त्याच युगी झाला मारुती जन्म।।१४।। मारुतीची जन्मकथा सुंदर। ऐका भक्तहो होऊनी सादर। सांगती ही कथा ऋषी सुत। सकल शौनकादि ऋषिंसी।।१५।। व्यंकटाचलाचे नाम अंजनाद्रि। जाहले ख्यात ते त्रेतायुगी। कृतयुगी नाम वृषभाद्रि। द्वापारी नाम शेषाचल।।१६।। कलीयुगी हाची वेंकटगिरी। व्यंकटेशावतारे झाले प्रसिध्दी। 'वें' नाम पाप, कल्मशची। कट म्हणजे करीतसे नाश।।१७।। आता मारुती जन्म सांगतो। जाहला त्रेतायुगी जो। अंजना माता मारुतीची हो। होती ती पतिव्रता सती।।१८।। पती तिचा केसरी नाम। होता तो एक वानरराज। सुखी असे त्यांचा संसार। परी एक दुःख उभयतांसी।।१९।। म्हणे पुत्राविन शून्य हे सदन। सरोवर

जैसे उदकाविण। जैसे नासिकेविन वदन। कैसी शोभा असेल त्यास।।२०।। प्राणांविन जैसे शरीर। किंवा फलाविन जैसे तरुवर। तैसे पुत्राविन खरोखर। वंश पवित्र कैसा होय।।२१।। ऐसी अतीव दु:खी अंजना। निघे एकटी सोडूनी सदना। पोचली ती मतंगऋषी आश्रमा। अतीव चिंताग्रस्त मनी।।२२।। मतंगऋषी थोर तपस्वी। असती ते महान ऋषी। अंजना येऊनी त्यांचे पाशी। साष्टांग वंदन करीतसे।।२३।। म्हणे तयांसी मग अंजनी। आपण थोर तपस्वी मुनी। तुमचे मुळेच शोभा असे वनी। अति पवित्र शोभे हे वन।।२४।। आहात आपण करुणालय। आपले कृपे होई दु:खविलय। दयासिंधु आपण साचार। करावी कृपा मजवरी।।२५।। आपण ऋषिमाजी थोर। तपस्वीयांचा अग्रगणी आपण। करीते आपणा साष्टांग नमस्कार। व्हावे कृपावंत मजवरी।।२६।। माझा पति असे थोर। केसरी नामे वानरराज। असे वैभवयुक्त संसार। पुत्राविन परी सारेची शून्य।।२७।। नाही माझे पोटी सत्पुत्र। त्या कारणे मी चिंताग्रस्त। नसे माझे संसारी चित्त। आले शरण मी तवचरणी।।२८।। माझे सद्‌गुरु आपण। करावे मज मार्गदर्शन। जेणे होईल मज पुत्ररत्न। ऐसा उपाय सांगावा जी।।२९।। आपला शब्द मज प्रमाण। आचरिन मी त्यानुसार। काय करु ते सांगा आपण। जेणे होईल पुत्र प्राप्ती।।३०।। ऐकोनी तिचे दीनवचन। मतंग बोलती कृपा करुन। कल्याणप्रद असा असे उपाय।

सांगतो युक्ती तुजसी।।३१।। शुभलोचने ऐक वचन। पंपापासोनी पूर्व दिशेस। अंतरावरी योजन पन्नास। नारसिंहाचा असे आश्रम।।३२।। त्यांचे दक्षिण दिशेसी। नारायणगिरीचे उत्तर दिशी। रामतीर्था पासून कोसावरी। वियद्‌गंगा वसतसे।।३३।। जावे तेथे तू झडकरी। तेथे स्नान करुन निर्धारी। श्रध्दायुक्त तपश्चर्या करी। द्वादश वर्षां पर्यंतची।।३४।। तेणे होईल पुण्य प्राप्त। त्या पुण्ये होईल प्राप्त पुत्र। असेल तो एक अलौकिक। सत्य असे वचन माझे।।३५।। घेऊनी ऋषींचा निरोप। निघाली अंजनी तेथून। पावली तात्काळ ते स्थान। जाहली ती हर्षित।।३६।। स्वामीतीर्थी करुन स्नान। वंदिले वराहरुप भगवान। अश्वत्थ प्रदक्षिणा करुन। करु लागली ती तप।।३७।। कठोर असे तिचा निर्धार। आचरी ती तप खडतर। दृष्टी करुनी एकाग्र। करीतसे ती चिंतन।।३८।। त्यागिला तियेने आहार। जाहले काष्ठवन शरीर। सर्व भोगांचा करुन त्याग। करी तप अंजनी।।३९।। परम शुचिर्भुत होऊन। एकाग्रमने करी चिंतन। ऐसे सरती दिन प्रतिदिन। जाहली तपास द्वादशवर्षे।।४०।। होता तपास द्वादश वर्षे पूर्ण। आले एक नवल घडून। जाहले भगवान शिव प्रसन्न। देती तिजसी दर्शन।।४१।। सदाशिव म्हणाले अंजनीस। मिळेल कृपाप्रसाद तुज। बैसावे तू ओंजळ पसरुन। होईल प्राप्त तुज प्रसाद।।४२।। झाली अंजनी बहु मुदीत। बैसली ती ओंजळ पसरुन। होती ती शिवनामी दंग। नवल

एक घडून आले।।४३।। पाहुन शिवनाम रत अंजनीस। आले साक्षात पवमान तेथ। अंजनीने पसरले स्वहस्त। म्हणती द्यावा प्रसाद हीला।।४४।। पवमानाने मग ते अवसरी। आणूनी दिधले अंजनीचे करी। स्पर्श जाणुनी मग अंजनी। नेत्र उघडूनी पाहतसे।।४५।। पाहीले तिने पक्व फळ। होते तियेच्या हस्तात। मानुनी शिव कृपाप्रसाद। करी अंजनी भक्षण।।४६।। प्रसाद भक्षण करताची। जाहली अंजनी गर्भिणी। बहुत हर्ष जाहला मनी। करी ती शिवासी प्रणाम।।४७।। दशमास भरता तिजसी। प्रसविली ती पुत्रासी। होता पुत्र अति सुलक्षणी। होते परम तेज त्याचे।।४८।। ऐसा तेजस्वी दैदीप्यवंत। वानरवेष बळ अद्‌भूत। अवतरला हो हनुमंत। परम प्रतापी श्रीरामदूत।।४९।। अंजनीने तप येथे केले। तपाचे फळ तिज लाभले। पुत्ररत्न तिज प्राप्त झाले। पर्वताचे नाम झाले अंजनाद्रि।।५०।। मानिती जन्मतिथी चैत्र शुध्द एकादशी। कुणी मानिती कार्तिकी वद्य चतुर्दशी। कार्तिकी पौर्णिमा कुणी मानती। जन्मतिथी विषयी असे मतांतर।।५१।। जन्मदिन कुणी मानती शनिवार। मानिती काहीजण मंगळवार। परी सारेची हनुमन्ताचे भक्त। मानिती दोन्ही पुण्यकारक।।५२।। परी आज रुढी प्रचलित। चैत्र पौर्णिमेस असे मारुती जन्म। असती स्थानाप्रमाणे मत मतांतर। असे हनुमंत सर्वांसी आराध्य।।५३।। जेव्हा जन्मला हनुमान। शंकरे पाचारीले पवनास। सांगिती तयास शंकर।

मम शक्ती अर्पावी तयासी।।५४।। जाहला प्रकट प्रत्यक्ष पवन। म्हणे मी करीन हे कार्य। जाहले संतुष्ट सदाशिव। म्हणती मागावे वरदान।।५५।। पवन म्हणे आपुला चाकर। आपुली सेवा हे मम कार्य। देऊ इच्छिता जर वर। तरी द्यावे आपुले पितृत्व।।५६।। म्हणती त्यास प्रसन्न शंकर। म्हणतील मारुतीस पवनपुत्र। लाभले पितृत्व वायुदेवास। जाहला तो अतिसंतुष्ट।।५७।। गेला घेऊनी शंकरतेज। अर्पिले ते नवजात बालकास। पाहुनी केसरी, अंजना संतुष्ट। म्हणती आपणा चरणी वंदन।।५८।। अर्पिले पवनाने रुद्र सामर्थ्य। तैसेची दिधले वरदार। अतिचपळ उड्डान सामर्थ्य। जाहले प्राप्त बालकासी।।५९।। जन्मताची गाजवून पराक्रम। केला मारुतीने राक्षस संहार। रक्षिले त्याने केसरीचे राज्य। जाहले प्रसन्न वायुदेव।।६०।। मारुतीने विजय प्राप्त करुन। वंदिले मातापिता चरण। केले वायुदेवास सादर वंदन। दिले तयांसी पितृस्थान।।६१।। माता अंजनेचा मोद थोर। मारुती म्हणे द्यावे नाम। दिले 'बजरंग बली' ऐसे नाम। मातेने आपुल्या पुत्रासी।।६२।। पवनासारखा अति चपळ। मारुती होता फार अवखळ। बाललीला त्याच्या अति सुंदर। मातापिता होती धन्य।।६३।। अंजना करीतसे नित्योपासना। सूर्योदय समयी करी साधना। परी नवल वर्तले एकदा। मारुतीस लागली भूक।।६४।। अंजनी गेली आहार आणण्यास। पाहीले उगवत्या सूर्यास। वाटले मारुतीस ते फळ

सुंदर। केले त्याने आकाशी उड्डान।।६५।। आली अंजना परतुनी। मारुतीस मग ती पुकारी। पाहुनी तेथे मारुती नाही। जाहली ती चिंतातुर।।६६।। मारुती पोहोचला सूर्याजवळ। पाहुनी अतिसुंदर बिंब। मानुनी ते रुचिर फळ। गिळीले मारुतीने सूर्यास।।६७।। दाटला सर्वत्र घनदाट तम। कळेना इंद्रास जाहले काय। वदले तयासी सर्व देव। गिळीले मारुतीने सूर्यासी।।६८।। जाहला इंद्र अतिकोपायमान। धावला घेऊनी आपुले वज्र। म्हणे मारुतीस सोड सूर्यास। मारुतीने ते ऐकले नाही।।६९।। ऐकेना मारुती हे पाहून। चढला इंद्रास क्रोध फार। केला मारुतीच्या मुखावर। इंद्राने मग वज्रप्रहार।।७०।। तेणे मारुती झाला विद्‌ध। पडले बाहेर सूर्यबिंब। पसरला सर्वत्र पुनःप्रकाश। परी मारुती झाला बेशुध्द।।७१।। पडला मारुती आकाशातून। झेलि तयासी मग पवन। आपुल्या हाती त्यास घेऊन। आले पवन भूमीवर।।७२।। ठेविले त्यास अंजनी समोर। पाहुनी आपला बालक मृत। जाहले अतिदुःख मातेस। करी ती अतिशय शोक।।७३।। जाहले पवनदेव कोपायमान। रोधला त्याने मग वायु प्राण। सृष्टी चराचर देवाधिदेव। सर्वांचे प्राण आले कंठासी।।७४।। सांगती मग देव इंद्रास। आपण मारीले पवनपुत्रास। तेणे तो झाला कोपायमान। रोधल असे त्याने वायु।।७५।। इंद्रास उमगली आपली चूक। देवांसह आला पृथ्वीवर। करी विनंती वायुदेवास। वाचवावे आपण

चराचर।।७६।। पवन म्हणे मारीला मम पुत्र। का केले ऐसे दुष्ट कृत्य। तो तर एक अजाण बालक। ऐसा कठोर दंड का दिला।।७७।। इंद्राने अर्पिले मारुतीस जीवन। जाहला मग मारुती जीवंत। मग पवने मुक्त केले वायुस। जाहला सुरु जीवन प्रवाह।।७८।। परी पूसले तयाने इंद्रास। केला प्रहार मुखावर। शक्र म्हणे तेणे त्याचे सौंदर्य। होईल अधिक शोभायमान।।७९।। तेणे मारुतीस मिळाले नव नाम। म्हणतील त्यास हनुमान। पवनसुत बजरंग बली हनुमान। होईल अतिशय सामर्थ्यवान।।८०।। मारुतीच्या असती बाललीला। तयाने बहु पराक्रम केला। सांगतो त्यातील एक आता। ऐकता हरतील दुःखे सारी।।८१।। बालमारुतीच्या लीला ऐकून। झाला रावण कोपायमान। पाठवी तो कर्कोटक राक्षस। बाल मारुतीचा वध करण्यास।।८२।। कर्कोटक करीतसे विष फुत्कार। निष्प्रभ करी मारुती सर्व। कर्कोटक म्हणे मी तुज मारीन। असे हाच माझा निश्चय।।८३।। तेव्हाच अंजनाने केला प्रवेश। केला कर्कोटके प्रहार तिजवर। पाहुन मारुतीस आला क्रोध। म्हणे देईन याचे शासन।।८४।। केला मारुतीने प्रहार त्यावर। दिधला दंड त्यास यथोचित। जाणले कर्कोटकाने सत्य। असे हा प्रत्यक्ष महादेव।।८५।। कर्कोटक आला त्यास शरण। केले त्याने मारुतीस वंदन। केले त्याने मग क्षमापान। शंकरे केली त्यावर कृपा।।८६।। दिधले तयासी प्रत्यक्ष दर्शन। केले तयासी मार्गदर्शन। जाहला

कर्कोटक तेणे मुक्त। सांगे जाऊन मग रावणास।।८७।। धरीला त्याने भक्तीमार्ग। जाहला कर्कोटकाचा उध्दार। ऐशी हनुमंतलीला सुंदर। दाखवी भक्तिमार्ग सर्वांस।।८८।। होता जेंव्हा मारुती गुरुआश्रमी। करी विद्याग्रहण गुरुं करवी। असुर बालक तयास पीडती। शांतपणे करीतसे सहन।।८९।। केले कपट असुर बालकांनी। द्यावी मारुतीस शिक्षा म्हणूनी। आणुनी अडथळा नित्य कामी। दंड मारुतीस देवविला।।९०।। गुरु सांगती शिक्षा मारुतीस। म्हणती रक्षावे आश्रमास। होईल अष्टलक्ष्मी यज्ञ येथ। तेंव्हा करावे हे कार्य।।९१।। ताटिका नामे भयंकर राक्षसी। ती नेहमी यज्ञ विध्वंसी। करुनी सामना तिजसी। रक्षावा आश्रम तिजपासोन।।९२।। मारुती करी शिक्षेचा स्वीकार। म्हणे मी पार पाडीन कार्य। मारुती अंत:करणी भक्ती फार। करीतसे भक्ती श्रीरामाची।।९३।। मारुतीस प्रचंड शक्ती वरदान। होते लाभले शिवा पासून। पवनाने दिले गति सामर्थ्य। इंद्रे दिली असे दिव्यशक्ती।।९४।। सर्व देवदेवांनी दिल्या शक्ती। तेणे बलीष्ठ होता मारुती। वरी अलौकिक श्रीरामभक्ती। त्याकारणे निर्भय होता मारुती।।९५।। मारीले तयाने प्रचंड राक्षस। त्राटिकेने पाठविली माया तेथ। तिच्या पासून रक्षिले यज्ञास। जाहला सुफल पूर्ण यज्ञ।।९६।। परी त्राटिका राक्षसी भयंकर। करीतसे भयंकर संहार। तियेने त्रासिले सारे वन। मारुतीने केला सामना तिचा।।९७।। करुनी तिजसवे भयंकर युध्द।

केले मारुतीने तिज विध्द। परी न मारी मारुती तिज। कारण मारुती अकरावा रुद्र।।९८।। शिव वरदाने झाला त्राटिकेचा जन्म। तैसेची असे तिचे मरण। करणार प्रत्यक्ष श्रीराम। म्हणूनी मारुती न मारी तिज।।९९।। परी मारुतीने दंड देऊनी। हाकलीले तिज दुसरे वनी। केली सुखी त्या वनातील सृष्टी। ऐशा मारुतीस त्रिवार वंदन।।१००।।

श्री मारुतीदेवता चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

जल बाँधु वायु बाँधु, बाँधु जल के तिर, पाँचो काला कलवा बाँधो,
बाँधु हनुमंत वीर, सहदेव तेरी लाकडी, अर्जुन तेरो बाण, शत्रु की गती थाम दे,
यती हनुमान की आन, शब्द साँचा-पिंड काँचा, मेरे गुरू का इल्म साँचा,
फुरो मंत्र, इश्वरो वाचा, दुहाई गोरखनाथ की

## ।। विद्वेषणाध्याय ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री हनुमते नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

श्री गजानना चरणी नमन। श्रीरामचरणी करुनी वंदन। केलेले सुरु नवशती लेखन। होईल पूर्ण तयांचे कृपाप्रसादे।।१।। सद्‌गुरु माझे प्रज्ञावासी। नमितो त्यांचे चरणकमलासी। देऊन मज कृपाप्रसादासी। द्यावी मती हया गणेशासी।।२।। हनुमंत लीला कौतुक वर्णिण्या। देईल सामर्थ्य सुतअंजना। तेणे करुन भवभय भंजना। करील मम जीवन कृतार्थ।।३।। हनुमंतासी प्राप्त वरदान। इंद्रादि देवांनी दिधले पूर्ण। तेणे त्याच्या बाललीला कौतुकपूर्ण। वर्णिता शब्द अपुरे पडती।।४।। बाल हनुमंत दावी प्रताप। असे तो प्रत्यक्ष कैलासाधीश। ते कौतुक पाहुनी जांबुवंत। होतसे विनित त्याचे चरणी।।५।। वानर केसरी मारुती पिता। वाली वानर त्याचा चुलता। वाली येणार भेटी करीता। केसरी तयारी करीतसे।।६।। हनुमंत आपल्या सवंगडयांसह। करीतसे पित्यास सहाय्य। होता मनी बहुत उत्साह। आला वनी मित्रांसमवेत।।७।। बालकांसह होते जांबुवंत। तेंव्हा आला वाली तेथ। पाहतसे तयासी

हनुमंत। वालीही पाही हनुमन्तास।।८।। जांबुवंत पुसतसे तयांस। आहे का परस्पर परिचय। वाली म्हणे न ओळखे यास। हनुमंत म्हणे मी न जाणे यास।।९।। जांबुवंत देतसे वाली परिचय। म्हणे हा वाली असे वानरराज। नात्याने असे तुझा चुलता। याचा बंधु तुझा पिता।।१०।। जांबुवंत म्हणे हे हनुमंता। द्यावा कैसा परिचय आपुला। हनुमंत म्हणे मी सांगतो आता। वानरराज केसरी मम पिता।।११।। अंजना असे माझी माता। ऐकूनी वाली वदे हनुमंता। बलशाली असशी ऐकली वार्ता। परी मजसम नसे वेगवान अन्य।।१२।। म्हणती सवंगडी मारुतीचे। व्हावी स्पर्धा परस्पराते। दावावे सामर्थ्य आपण येथे। तेंव्हाच मानु आम्ही तुम्हासी।।१३।। स्पर्धा आयोजितसे जांबुवंत। घेई हाती तो एक पाषाण। म्हणे मी फेकीन हे आकाशात। कोण आणील तोच विजयी।।१४।। मान्य वालीसी अन् मारुतीसी। सवंगडी टाळया वाजविती। पाषाण तो फेकीता आकाशी। बाली त्वरेने उड्डान करीतसे।।१५।। त्याचे नंतर उड्डान करी मारुती। निघाला वेगे वाली पुढती। येत होता मागून मारुती। पाहूनी वाली अस्वस्थ मनी।।१६।। आली संपत वालीशक्ती। पोहोचत होता पाषाणा प्रती। परी मारुतीही असे सोबती। कोणा हाती येईल पाषाण।।१७।। वाली बहु अस्वस्थ चित्ती। जाईल पाषाण मारुती हस्ती। परी मनी विचार करुन मारुती। फिरतसे मागे तो तात्काळ।।१८।। आला प्रथम तो

भूमीवरती। सारे सवंगडी त्यासी पाहती। नसे पाषाण मारुती हस्ती। सारे पुसती मारुतीसी।।१९।। दावी बोट मारुती। असे पाषाण वाली हस्ती। जांबुवत मनी विचार करती। कैसी लीला ही प्रभुची।।२०।। वाली विजय न मानती बालक। म्हणती स्पर्धा आम्हा समोर। झाल्यास मानू आम्ही सर्व। पुन्हा दुसरी स्पर्धा व्हावी।।२१।। म्हणती व्हावे गदायुध्द। व्हावे वाली मारुतीचे द्वन्द्व। म्हणे मारुती कशास युध्द। नसे मान्य ते मजसी।।२२।। परी बालकांनी केला हट्ट। वाली युध्दास होताच सज्ज। मारुती मान्य करी युध्द। झाले द्वन्द्व उभयतांमध्ये सुरु।।२३।। आकाशी जमले सारे देव। पाहती ते ऐसे अनोखे द्वद्वं। चालले युध्द अति तुंबळ। कोण विजयी ह्या दोघांतून।।२४।। जांबुवंतास झाले स्मरण। असे वालीस प्राप्त वरदान। प्रतिस्पर्ध्याचे विलोकित नयन। त्याची अर्धी शक्ती लाभेल।।२५।। म्हणती उगीच केले मान्य। काय कारणार मी असे दीन। असेल या मागे काही कारण। असे ही तर प्रभुची लीला।।२६।। देवाधिदेव इंद्रास म्हणती। केल्या प्रदान मारुतीस शक्ती। त्या सर्व वालीस लाभती। झाले संभ्रमीत ते सर्व।।२७।। चालले असे तुंबळ युध्द। भिडती उभय परस्परांस ते सर्व। मेळवूनी पाहती नयनात। होती मारुती शक्ती संक्रमित।।२८।। चालले द्वन्द्व बहुत समय। वाली जोरदार भिडे मारुतीस। होता तयात शक्ती संक्रमित। होतसे विव्हळ वाली।।२९।।

परी निकराते करीतसे प्रयत्न। परी शरीर त्यास न दे साथ। वाली पडला खाली भूमीवर। हरपली वालीची शुध्द।।३०।। पाही तयाकडे मग मारुती। मारुतीकडे मग साऱ्या शक्ती। आल्या सर्व फिरुन परती। वाली उघडतसे नयन।।३१।। राही उभा मग वाली। धावूनी मारुतीचे चरणधरी। म्हणे स्वयंरुद्र आपण स्वामी। आपुला मी भक्त असे।।३२।। केसरीस मिळाली होती वार्ता। आला धावुनी तो सह पिता। वाली वंदन करीत होता। आपुल्या सान बालकासी।।३३।। म्हणे तेंव्हा वालीस केसरी। हा तर आपुला बालक परी। वंदन कासया तया चरणी। उठा उठा हो वालीराज।।३४।। म्हणे वाली असे हा महान। याचेने वानरकुळ शोभायमान। ऐसा अलौकिक पुत्र पावून। जाहला आपण धन्य धन्य।।३५।। कशासी मग मारुती म्हणे। आपण गोविले मज येथे। जाईन मी क्रीडा करायाते। द्यावी मजसी आपण आज्ञा।।३६।। ऐशा मधुर बाल मारुती लीला। वर्णिता वाचता मोद वेगळा। शंकराच्या हया असंख्य लीला। बालरुप त्याचे अति गोंडस।।३७।। म्हणते सरस्वती कैसे वर्णू। हा तर प्रत्यक्ष पवन सूनु। शब्द सरिता पडतसे सानु। वर्णिण्या अगाध महिमा।।३८।। त्रेतायुगी झाला रामावतार। तयाची सेवा करण्याचा निर्धार। म्हणून घेई शिव अवतार। आपल्या हया भूमंडळावरती।।३९।। जाहली धन्य धन्य धरणी। पाहतसे ती अगाध करणी। विष्णु शिवांची ही मेळणी। म्हणे माझे भाग्य

थोर।।४०।। जे असे सर्वथा असाध्य। हनुमानाचे कर्तृत्व वर्णन। कैसे करावे मी नवशतीत। प्रश्न असे मम मानसी।।४१।। परी स्वामीरुपे तोची केवळ। करीतसे प्रकट शब्द वैभव। मी तर असे भक्त पामर। परी वरदहस्ते झालो सिध्द।।४२।। जय जयाजी तुम्हा हनुमंता। करुणासागर आपणची आता। द्यावी मती लक्ष्मणसिंधुसुता। विनम्र विनंती आपुले चरणी।।४३।। अंबरीषाचे करुनी निमित्त। भूवर अवतार घेती श्रीकांत। म्हणूनी इतरही सर्व देवाधिदेव। घेती भूवरी अवतार।।४४।। करण्या अधर्माचा अंत। मारण्या मातल्या राक्षसांस। दशाननाचा करण्या वध। हरि मानवरुप करी धारण।।४५।। तयाची भक्ती शिवहृदयी। म्हणूनी करण्या सेवा तयाची। सदाशिव घेई अवतारासी। सांगे तो पार्वतीस तेधवा ।।४६।। म्हणे मी घेईल अवतार। हरिस्तव या धरणीवर। रहाणे तुजसी कैलासावर। अवतार समाप्ती पर्यंत।।४७।। म्हणे मग पार्वती शिवासी। असे मी अर्धांगिनी आपुली। अर्ध्याच अंगे सेवा कैसी। होईल आपुले हातून।।४८।। म्हणूनी मी येईन तुम्हासह। तुम्हास साजेसा धरीन देह। शंकर म्हणे मी होईल वानर। करण्या सेवा श्रीरामाची।।४९।। केले तेंव्हा सदाशिवाने मान्य। दिले पार्वतीस पुच्छ सान। जाहला शिव भव्य वानार। पार्वती त्याची पुच्छ थोर।।५०।। ऐसा झाला मारुती अवतार। बाललीला तयाच्या थोर। सांगितल्या आता पराक्रम। पुढील तयाचा

सांगेन।।५१।। हनुमंत हृदयी प्रत्यक्ष राम। मुखी सदैव असे रामनाम। करी रामभक्ती निरंतर। रामनामी असे नित्य दंग।।५२।। कथा एक असे ऐसी ही। स्वतः शिव हनुमान घेऊनी। गेले अयोध्येस मदारी होऊनी। आले हनुमानासह राजभवना बाहेर।।५३।। श्रीरामे ऐकला नाद डमरुचा। बंधुसह त्यास पाहण्या धावला। समोर पाहुन प्रत्यक्ष श्रीरामा। जाहले शंकर बहु प्रसन्न।।५४।। करविले तयाने विविध खेळ। पाहुनी रामा मारुती चपळ। होऊन मुदित करी बहुतवेळ। नानाविध प्रकारचे खेळ।।५५।। जाहला बाल श्रीराम प्रसन्न। घेतले वानरास अंकावर। फिरवितसे प्रेमे तो स्वकर। सर्वांगावरुन हनुमानाच्या।।५६।। ठेवोनी तयास श्रीरामाजवळ। गेले निघोनी श्रीशंकर। राही रामासवे तो वानर। बहुत प्रकारे रिझवी रामास।।५७।। ऐसा लाभला श्रीहनुमानास। बालक श्रीरामाच सहवास। तैसेची लाभले प्रेम तयास। अतिशय आनंदी जीवन झाले।।५८।। आले विश्वामित्र अयोध्येस। मागितले तयांनी दशरथ पुत्रांस। पाळण्या स्वपित्याचे वचन। निघाला राम सलक्ष्मण तयांसवे।।५९।। श्रीरामे प्रेमे कथिले मारुतीसी। आपण आता जावे वनासी। व्हावे सहाय्यक सुग्रीवासी। करावी सेवा तयाची।।६०।। प्राप्त होता तैसा समय। येईन मी लक्ष्मणासह। घडवूनी आणावी आमची भेट। सुग्रीवासह तेधवा।।६१।। रामाज्ञे निघाला दास वानर। आला जेथे किष्किंधानगर। होता वाली तेथे

नृपवर। तयाचा बंधु सुग्रीव।।६२।। होती तयांत अजोड प्रीत। परी नियती ऐसी विचित्र। घडूनी आले असे अवचित। झाले उभय परस्पर वैरी।।६३।। मयाचा पुत्र मायावी नामक। झाला होता गर्वे उन्मत्त। ललकारीले त्याने वालीस। धावला वाली युध्द करण्या।।६४।। अग्रज निघालेला पाहून। गेला सुग्रीवही धावून। आले उभय अत्यंत दूर। पाहीला त्यांनी विशाल विवर।।६५।। असुराने केला त्यात प्रवेश। तेंव्हा दारी ठेवूनी सुग्रीवास। सांगितले वालीने तयास। करावी प्रतिक्षा पंधरा दिवस।।६६।। केला मग वालीने गुहेत प्रवेश। सुग्रीवे पाहीली वाट एक मास। झाला सुग्रीव अति चिंतीत। दिसता तयासी रक्ताची धार।।६७।। पाही सुग्रीव वालीची वाट। परी न लागे चाहुल त्यास। वाटले राक्षसे मारीले वालीस। आता तो मज मारील।।६८।। करुनी मग ऐसा विचार। पाषाणे झाकीले गुहेचे द्वार। आला तो राज्यात परत। मंत्र्यांनी सुग्रीवास राजा केले।।६९।। काही दिनानंतर वाली। राक्षसांचा वध करोनी। आला राज्यात तो परतोनी। नृपस्थानी पाही सुग्रीवास।।७०।। झाला वाली बहु क्रोधीत। म्हणे हा राज्याचा लोभीत। म्हणुनीच झाकीले गुहेचे द्वार। दुष्ट लालची हा सुग्रीव।।७१।। बळे वाली घेई ताबा राज्याचा। घेतला ताबा सुग्रीव पत्नीचा। धावला सुग्रीवाचा वध करण्या। भये सुग्रीव करी पलायन।।७२।। सुग्रीवासह होता हनुमान। आठवला तयास मतंगऋषी श्याप। सांगितले तयाने

सुग्रीवास। आले उभय ऋष्यमूक पर्वती।। ७३।। वालीस होता मतंगऋषि श्याप। जर तो येईल ऋषि आश्रम परिसरात। होईल शतधा तयाचे शिर। आश्रम होता ऋष्यमूक पर्वतावर।।७४।। राही सुग्रीव ऋष्यमूक पर्वतावर। हनुमंत होता तयासमवेत। वालीही देतसे हनुमंता सन्मान। परी आला तो सुग्रीवासह।।७५।। जाहला हनुमंत सुग्रीव सचीव। देई तो धैर्य अन् सत्परामर्श। तेणे अशा विपत्ती स्थितीत। लाभे सुग्रीवास सुखानुभूती।।७६।। मातापित्याचे वचन पाळण्यास्तव। स्वीकारीला श्रीरामे वनवास। लक्ष्मण आणि सीता यांचे सह। आले श्रीराम दण्डकारण्यात।।७७।। लक्ष्मण,सीता अन् श्रीराम। फिरत होते वनावनांतून। लक्ष्मणासह श्रीराम करी मुनिरक्षण। त्रास देणाऱ्या असुरां मारुन।।७८।। चौदाव्या वर्षी होते पंचवटीत। तेथून रावणे केले सीताहरण। शोधण्या तिज रामलक्ष्मण। होते फिरत वनावनांतून।।७९।। विराध, कबंधादिंचा करुन वध। आले उभय शबरी आश्रमात। स्वीकारीले तयांनी शबरीचे आतिथ्य। शबरीने तया मार्ग दर्शविला।।८०।। तेथून निघून सानुज श्रीराम। आले दोघे ऋष्यमूक पर्वतासमीप। तेजस्वी दोघा पाहून झाला भयभीत। सुग्रीवमनी होते वालीभय।।८१।। सांगितले तयाने हनुमंतास। असे वाली छलकपट शूर। त्यांनीच पाठविले या दोघांस। माझा वध करण्यासाठी।।८२।। हनुमंता तू शूर अन् वीर। असशी अतिशय बुध्दिमान। घेई करुन यांचा परिचय।

हे कार्य करण्या तूची समर्थ।।८३।। पहावे ते आपुले शत्रु की मित्र। जर असतील ते वालीचे मित्र। द्यावा संकेत तैसा आम्हास। मंत्रिगणांसह मी करीन पलायन।।८४।। ऐकून सुग्रीवाचे ऐसे वचन। निघाले पवनकुमार तेथोन। जरी नव्हते ठाऊक काही तयास। परी शुभसंकेत तया होत होता।।८५।। हनुमंते धरीला ब्राह्मणवेष। पातला तो ऋष्यमूक पर्वततल। पाहुन उभयता झुकले मस्तक। विनम्रभावे करी विचारणा।।८६।। पाहुन आपणा वाटे मनास। आपण श्यामगौरवर्ण पुरुष। आहात आपण क्षत्रियकुमार। परी तनु आपली अतिकोमल।।८७।। हा पर्वत आणि वन भयंकर। असे येथे हिंस्र पशुभय। मार्ग येथला कंटकयुक्त खडतर। कोणते कारणे आला येथे।।८८।। पाहुन अतितेजोमय रुप। वाटे आपण पुरुष लोकोत्तर।आहात आपण नारायण वा नर। कदाचित स्वयं परमात्माची असाल।।८९।। ऐकून हनुमंताचे मधूर वचन। लक्ष्मणास म्हणती श्रीराम। बोलणे यांचे विद्वत्तापूर्ण। वेदाध्यायी विद्वान असावे हे।।९०।। असावा यांचा शास्त्राभ्यास। वाणी यांची संस्कार क्रम पूर्ण। बोलणे स्पष्ट उच्चार मधुर। करावा वार्तालाप लक्ष्मणा।।९१।। लक्ष्मण मग बोले मारुतीस। आम्ही अयोध्यानरेश पुत्र। हे श्रीराम आणि मी अनुज लक्ष्मण। पितृवचनार्थ आलो वनात।।९२।। असता पंचवटीत निवास। रावणाने केले सीताहरण। घेत घेत सीतेचा शोध। आलो असो आम्ही येथे।।९३।।

ऐकत असता लक्ष्मण वचन। श्रीराम मुखावर मारुतीचे ध्यान। जाहले अश्रुपूर्ण त्याचे लोचन। ऐकून परिचय आपुले प्रभुचा।।९४।। घातला त्याने साष्टांग प्रणाम। अश्रुने केले त्यांचे पाद प्रक्षालन। म्हणे तो सद्‍गदित वचन। दयाघन तुम्ही माझे स्वामी।।९५।। मी तर असे एक पामर। न ओळखले मी तुम्हास। परी आपण कसे अनजान। विसरलात या दासास।।९६।। हे स्वामी आपण दयाघन। करावी कृपा या पामरावर। करीत असता ऐसे क्षमापान। जाहले हनुमान आत्मविस्मृत।।९७।। विसरले ते आपुले ब्राह्मणवेष। जाहले प्रकट वानररुप। पाहुन हनुमानाचे खरे रुप। श्रीरामाने उठविले तयास।।९८।। धरीले तयास निजहृदयी। फिरविला हस्त शिरावरुनी। हनुमान सद्‍गदित होवोनी। जाहले ते भावविभोर।।९९।। ऐसे भक्त भगवंताचे मिलन। पाहता धन्य सुमित्रनंदन। धरीतसे तोही हनुमंतास। आपुले हृदयी बहु प्रेमाने।।१००।।

श्री व्यंकटेशचरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

ओम नमो आदेश गुरु को वीर बली हनुमन्त जी मुगदर दाहिने हाथ।

मार मार पछाड़िये, पर्वत बाये हाथ। भूत प्रेत अरु डाकिनी, जिल्द खईस मसान।
बचै न इनमें एकहू, निराकार की आन। दुहाई अंजनी की, दुहाई राजा राम चन्द्र की,
दुहाई लछमण यती की। मेरी भक्ति गुरु की शक्ति, फुरो मंत्र ईश्वरो वाचा।।

## ।। उच्चाटनाध्याय ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री हनुमते नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

नमन नमन हो स्वामी समर्था। आपणची सर्व कर्ता करविता। आपुलेच आशीर्वचने आता। होतसे साकार मारुती नवशती।।१।। हनुमंत, बजरंगबली, मारुती। असे अपार जयाची शक्ती। तैसेची अगाध त्याची मती। शब्दातीत तयाचे चरित्र।।२।। ऐसा दासानुदास नसे अन्य। भक्ताग्रणी हा हनुमान। भेटता तयासी श्रीराम। धन्य कृतार्थ जाहला मनी।।३।। हनुमान सुग्रीवाचा सचीव। सुहृद, सखा, जीवलग मित्र। आला तयाचे करण्या कार्य। सांगे रामास तयाविषयी।।४।। असे सुग्रीव वालीबंधु। सांगतो मात हे दयासिंधु। जाहला बंधुच वैरी, शत्रु। निघाला मारण्या सुग्रीवास।।५।। केले सुग्रीवास राज्य बहिकृत। घेतले त्याचे पत्नीस हिरावून। पत्नी वियोगाचे अत्यंत दुःख। असे सुग्रीवाचे मानसी।।६।। कंठतसे तो या वनी समय। नसे त्राता कुणी तयास। आपणासही स्त्री वियोग दुःख।

करावी मैत्री तयासवे।।७।। करावे परस्परांचे कार्य। व्हावे सुग्रीवास सहाय्य। तोही नक्कीच देईल साथ। होईल पुर्ण कार्य उभयतांचे।।८।। हा ची हेतू श्रीरामाचे मनी। हनुमंतास 'हो, बरे' म्हणुनी। चलावे सुग्रीवभेटी लागोनी। ऐकून हनुमंत होई हर्षित।।९।। स्वामीस म्हणे मारुती। असे हा पर्वत दुर्गम अती। बसुनी उभय मम स्कन्धावरती। चलावे आपण सुग्रीवाकडे।।१०।। केली हनुमंते काया विशाल। स्थापिले रामास एका भुजावर। दुसरे भुजी स्थापोनी लक्ष्मणास। वायुवेगे निघाला मारुती।।११।। सुग्रीव पाहतसे दुरुन। मारुती येतसे वायुवेगे करुन। स्कंधावर दोन वीरांस पाहुन। जाहला सुग्रीव हर्षित।।१२।। आले ते सुग्रीवा समीप। होता श्रीराम सलक्ष्मण। करी सुग्रीव तयांस प्रणाम। जाहले सर्व अति प्रसन्न।।१३।। हनुमंते करुन दिला परिचय। झाले परस्पर मित्र उभय। करुनी प्रज्ज्वलीत मग अग्नीस। केली स्थापित मैत्री तयांची।।१४।। सांगे सुग्रीव आपुली कथा। वालीने हीरावली मम कांता। उत्सुक तो मज मारण्या। त्याचे भीतीने केले पलायन।।१५।। हया पर्वती नसे त्याचे भय। राहतो येथे मी उद्विग्न चित्त। द्यावे आपण मज अभय। व्हावे त्राता आपणची।।१६।। म्हणे तयास मग श्रीराम। वालीस एक बाणे मारीन। देईन मिळवून पत्नी, राज्य। व्हावे आपण निश्चिंत।।१७।। म्हणे तेंव्हा सुग्रीव त्यास। मीही देतो आपणा वचन। सीता शोधाच्या

कार्यात। होईन आपणा मी सहाय्य।।१८।। केला श्रीरामाने वालीवध। मिळाले सुग्रीवास राज्य। रुमा तयाची पत्नी मिळे त्यास। जाहला सुग्रीव प्रसन्न।।१९।। वाली पत्नी करीतसे दुःख। हनुमंते समजाविले तियेस। तुझा पुत्र वीर अंगद। करावे तयास आश्वस्थ।।२०।। लक्ष्मणे स्थापिले सुग्रीवास। किष्कींधेचा नृप झाला सुग्रीव। वालीपुत्र अंगद झाले युवराज। लाभले सुग्रीवा सकल सौख्य।।२१।। असता स्वयं श्रीराम प्रसन्न। असता श्रीरामाचे वरदान। असता श्रीराम अनन्य शरण। काय अशक्य या जगती।।२२।। श्रीराम निघाला तेथून। करण्या चातुर्मासाचे पालन। आले श्रीराम सहलक्ष्मण। प्रस्त्रवण गिरीवर तेधवा।।२३।। समीप होता चातुर्मास। प्रस्त्रवण गिरिवर करावा निवास। होते ऐसे रामाचे मानस। बन्धु लक्ष्मणासह राहीले तेथे।।२४।। मारुतीस हवा श्रीरामसहवास। होते जाणे त्यास रामासह। परी सुग्रीवाचा नवा राज्याभिषेक। निपुण सचीव तेथे असावा।।२५।। करुनी ऐसा विचार मनी। सांगती तैसे हनुमानासी। देण्या सहयोग सुग्रीवासी। तेणे कारणे रहावे तयासह।।२६।। सुग्रीवे केले तया सचीव। युवराज स्थानी होता अंगद। जांबुवंतादि मंत्रिगणांसह। करीतसे मारुती मार्गदर्शन।।२७।। श्रीराम सानुज राहीले गिरीवर। सुग्रीव पत्नी रुमा अन् तारासह। घेतसे सुखाने राज्योपभोग। जाहला दंग तो सुखात।।२८।। विसरला सुग्रीव आपली मैत्री। विसरला तो स्वतःचे दायित्व। परंतु मारुती

शास्त्र जाणकार। कर्तव्याचे ज्ञान होते त्यास।।२९।। मारुती असे सदा सावधान। होता सचिव परम बुध्दिमान। घेण्या जानकीचा शोध। होता अतिशय उत्सुक तो।।३०।। पाहीले त्याने निरभ्र आकाश। झाले निर्जल नद्यांचे जल। जाणले हाच योग्य समय। जानकी शोध घेण्यासाठी।।३१।। मारुती पाही सुग्रीव नृप। होता जाहला सुखलोलुप। झाला धर्मकार्य विन्मुख। योग्य जाणीव नसे तया।।३२।। सचीव तयाचा हनुमंत। केला तयाने हितोपदेश। प्रेमे तो म्हणाला सुग्रीवास। राजन् आपला विजय असो।।३३।। आपण तर थोर पराक्रमी। लाभली आपणा राज्यलक्ष्मी। त्या लक्ष्मीस पराक्रमे वाढवूनी। जाहलात हो आपण सुखी।।३४।। शेष असे परी कार्य एक। करणे वेळेत ते आपण पूर्ण। आपण आहा सदाचारसंपन्न। सनातन धर्म अनुरागी।।३५।। श्रीराम आपले परममित्र। त्यांच्या बळे लाभला विजय। त्यांच्या कार्यास होतसे विलम्ब। श्रीरामस असे समय ज्ञान।।३६।। आता करुनी यत्न आपण। करावा सुरु सीतेचा शोध। होतसे या कार्यास उशीर। असती श्रीराम अस्वस्थ।।३७।। तयांनी सांगितले नाही। त्यांनी सांगण्यापूर्वी काही। करावा कार्यारम्भ आपणची। असे हेच व्यवहारोचित।।३८।। असा आपण बहु पराक्रमी। कासया उशीर मित्र कार्यासी। सीतेचा शोध करण्यासाठी। वानरांस द्यावा आदेश।।३९।। आपल्या कल्याणार्थ श्रीरामाने। केला वालीवध एका बाणे। तुमचे कार्य करुनी

तयाने। केले पूर्ण आपुले कर्तव्य।।४०।। करुनी श्रीरामास कार्यसहाय्य। करावे वानर जातीस धन्य। व्हावे आपणही भाग्य संपन्न। आला आता उचित समय।।४२।। ऐकून सुग्रीवाचे ऐसे वचन। सुग्रीव जो सत्त्वगुण संपन्न। जाहला मनी तो भयग्रस्त। म्हणे आज्ञा शिरसावंद्य।।४३।। बोलावून सर्व युथपतीस। बोलावले सकल मंत्रिगणांस। म्हणे करावे सैन्य त्वरीत। मजसमोर उपस्थित।।४४।। इकडे श्रीराम झाले अस्वस्थ। संपून वर्षा सुरु झाला शरद। असे अजुन निष्क्रीय सुग्रीव। झाले ते बहु कोपायमान।।४५।। सांगितले त्यांनी लक्ष्मणासी। सांगा जाऊनी सुग्रीवासी। असेल वाटते आता तयासी। आम्ही राज्यभ्रष्ट, दीन, अनाथ।।४६।। लक्ष्मणा सांग तया जाऊन। आम्ही दाखविला मार्ग वालीस। होशील जर वचन पराङ्मुख। वधीन तुजसी बंधु वर्गासह।।४७।। ऐकून अग्रजाचे ऐसे बोल। संतापे लक्ष्मण झाला लाल। म्हणे मारुती त्या सुग्रीवास। बैसवीन अंगदास राज्यासनी।।४८।। पाहुनी कोपयमान अनुजास। म्हणती मग श्रीराम तयास। आपुला स्नेही असे सुग्रीव। मारणे तया सर्वथा अयोग्य।।४९।। केवळ सांगावा माझा निरोप। धमकावून तया यावे परत। ऐकून लक्ष्मण होऊन शांत। निघाला त्वरेने सुग्रीवाकडे।।५०।। येता किष्किन्धा नगरी समीप। केला लक्ष्मणे धनुष्य टंकार। झाले सकल वानर भयभीत। आला अंगद लक्ष्मणापाशी।।५१।। अंगदा पाहुन लक्ष्मण शांत।

होऊन म्हणाला अंगदास। सांग आता तूची सुग्रीवास। श्रीरामाचा ऐसा निरोप।।५२।। आला अंगद सुग्रीवाकडे त्वरीत। सांगितला तयास श्रीराम निरोप। ऐकुन सुग्रीव झाला भयभीत। पाठवी मारुतीस लक्ष्मणाकडे।।५३।। हनुमन्ते केला लक्ष्मणास प्रणाम। बोलला तयास विनम्र वचन। यावे आपण किष्किन्धा नगरात। हे तर असे आपुलेच गृह।।५४।। आला लक्ष्मणासह हनुमान। केले तयांचे ताराने स्वागत। म्हणे सुग्रीव असती सचिन्त। यावे आपण अंत:पुरात।।५५।। येता लक्ष्मण अंत:पुरात। सुग्रीवे पत्नीसह केला प्रणाम। मारुती म्हणाले लक्ष्मणास। आहेत सुग्रीव कार्यास सज्ज।।५६।। पहावे आपणची सत्य। येती चहुबाजुनी वानर। राजभवनाकडे होऊनी सज्ज। श्रीरामाचे कार्य करण्यासाठी।।५७।। बोलती सुग्रीव विनम्र वचन। राज्य, वैभव, सारे रामाचे वरदान। स्वत: श्रीराम असती समर्थ। साह्य करण्याचे लाभेल भाग्य।।५८।। केले सुग्रीवे लक्ष्मणपाद्य पूजन। निघाले सुग्रीव लक्ष्मणासह। निघाले मारुती, अंगदादि वानर। आले सकल वाद्य गजरात।।५९।। सुग्रीवाने येऊन केले वंदन। केले तयाने क्षमायाचना। जाहले श्रीराम त्यावर प्रसन्न। झाला सुग्रीव आनंदित।।६०।। सुग्रीव म्हणती श्रीरामास। वीर वानर, अस्वल येथे उपस्थित। जांबुवंत हे अस्वल प्रमुख। बलवान, वीर, अन् आपुले दास।।६१।। सुग्रीवाने दिला नल, नील। गवय, गवाक्ष, केसरी आदिंचा परिचय।

म्हणे आहेत सर्व युध्दास सज्ज। कार्य करतील आज्ञेप्रमाणे।।६२।। म्हणती तेंव्हा कौसल्यानंदन। असे ज्ञात आमुचे काम। पाठवावें यांसी सीता अन्वेषणार्थ। सुग्रीवे केली आज्ञा शिरोधार्य।।६३।। देती सुग्रीव आज्ञा सर्वांस। जावे सकलांनी सीता शोधार्थ। करावे कार्य अती शीघ्र। एक मासापर्यंत तुम्हा समय।।६४।। जर न मिळेल आपणा यश। होईल तुम्हा कठोर शासन। पाठविले तयांस विविध दिशेस। मग म्हणती सुग्रीव मारुतीस।।६५।। आपण वीर, कपिश्रेष्ठ। गति आपुली असे अविरोध। असुर देवतादि गंधर्व, मनुष्य। जाणता सर्वलोक नगादि समुद्रांसह।।६६।। तेज आपुले अलौकिक अजोड। बल, बुध्दी, पराक्रमही अतुल्य। ऐसे मारुतीचे करुन गुणगान। सुग्रीव बैसले रामा समीप।।६७।। अस्वल, वानर निघाले तेथून। करती ते श्रीरामास वंदन। आला शेवटी श्रीहनुमान। शिरी वरदहस्त ठेवून राम वदती।।६८।। तुमचा पराक्रम, धैर्य, सुग्रीववचन। ऐकून वाटे मम मनास। आपुले हस्ती होईल कार्य सिध्द। जावे घेऊनी मम अंगठी।।६९।। असती यावर मम नामक्षर। जाऊन द्यावी ही सीतेस। तेणे होईल तिज तुमचा परिचय। द्यावी अंगठी तिज एकांती।।७०।। आहात तुम्ही कार्य समर्थ। बुध्दी बलही अन् असे धैर्य। आहात बलशाली वीर। होईल तुमचा मार्ग कल्याणप्रद।।७१।। झाला मारुती सद्‌गदित। ठेविली अंगठी स्वसमीप। रामचरणी ठेविले स्वमस्तक।

श्रीरामे ठेवीला वरदहस्त।।७२।। आले मारुती विंध्यवनी ससैन्य। जाहले ते सकल तृषार्त। पाहीली विशाल गुफा तेथ। हंसक्रौचादि येत होते बाहेरी।।७३।। पाहुनी तयांचे पंख भिजलेले। हनुमंताने अनुमान केले। असेल जल येथे निश्चये। केला सकलांनी गुहा प्रवेश।।७४।। पाहीले निर्मल जलयुक्त सरोवर। साल, तमाल, नागकेसर। अशोक चम्पादि अनेक वृक्ष। होते बहरलेले फळाफुलांनी।।७५।। तेथे महल वस्त्रालंकारे सुशोभित। होते तेथे स्वर्ण सिंहासन। लावण्यवती रमणी अधिष्ठित। वल्कल मृगचर्म करुन धारण।।७६।। झाले समस्त अतिभयभीत। केला प्रणाम त्यांनी तिज। म्हणाली रमणी मग तयांस। कोणते कारणे आला येथे।।७७।। श्रीहनुमान वदले तियेसी। निघालो आम्ही श्रीरामकार्यासी। रावणे पळवून नेले सीतेसी। तिला शोधण्या निघालो सकल।।७८।। ऐकोनी ती झाली हर्षित। म्हणे तपश्चर्या सफल आज। भक्षुनी येथील मधुर फल। करावे येथे मधुर जल पान।।७९।। म्हणे हेमानाम विश्वकर्मा पुत्री। तिच्या नृत्ये संतुष्ट शिवाने तिजसी। दिले हे भव्यनगर निवासासी। राहीली ती सहस्र वर्षे येथे।।८०।। ती माझी सखी प्राणप्रिय। ब्रह्मलोकी जाताना म्हणाली मज। येथे राहुन एकान्ती करावे तप। त्रेतायुग सुरु होई पर्यंत।।८१।। त्रेतायुगी होईल रामावतार। येतील ते वनी राक्षस वधास्तव। सीतेचे हरण करील रावणासुर। तिचा शोध घेण्यास येतील वानर।।८२।। देऊनी तयांसी फल,

मधुरजल। जावे तू श्रीरामाकडे स्वयंम्। करावी प्रार्थना वंदून चरण। होऊन मुक्त जाशील विष्णुलोकी।।८३।। मी स्वतः असे स्वयं प्रभानाम। माझे पिता गंधर्व दिव्य नाम। आज खरोखरी असे सुदिन। जाहला माझा भाग्योदय।।८४।। घेऊनी तेथे जल फलाहार। निघाले सकल स्वकार्यास्तव। न लाभे सीतेचा शोध त्यांस। जाहले सकल चिंताग्रस्त।।८५।। जाहले ते सकल अतिभयग्रस्त। म्हणती तयांसी पवनसुत। नाहीत श्रीराम सामान्य मनुष्य। ते आहेत स्वयं नारायण।।८६।। सीता असे जगन्मोहिनी स्वयं। शेषावतार लक्ष्मण असती। समर्थ त्रयी असती कार्यासी। त्रिलोक रक्षणी जे असती समर्थ।।८७।। प्रकटले विष्णु रावण वधास्तव। त्यांच्या कार्यास करण्या सहाय्य। लाभले आपणा हे परमभाग्य। आपण चिंतीत होऊ नये।।८८।। ऐकोनी तयांचा कोलाहल। आले संपाती गुहे बाहेर। म्हणाले लाभले मला भोजन। परमभाग्य माझे असे।।८९।। म्हणाले त्याच समयी वानर। धर्मात्मा जटायु खरेची धन्य। दिले तयाने श्रीरामास्तव प्राण। पावले दुर्लभ मोक्षपदासी।।९०।। ऐकून जटायूचे नाम। झाले सम्पाति अति खिन्न। विचारी आपण वानर कोण। घेतलेत आपण जटायू नाम।।९१।। सांगावा मजसी सर्व वृत्तांत। असे जटायू मम सहोदर। गेला अंगद मग त्याचे समीप। सांगितला जटायू वृत्तान्त।।९२।। म्हणाला सम्पाति मग तयांस। जटायू माझा भाऊ परमप्रिय। ऐकून तयाचा सर्व वृत्तान्त। झाले माझे

चित्त प्रसन्न।।९३।। न्यावे मज जलस्थाना समीप। देईन जलाज्जली मी बंधुस। गेले घेऊन सकल तयास। जलज्जली देऊन तो झाला मुदित।।९४।। म्हणे आहे त्रिकूट पर्वती नगरी। रावणाची ती असे लंकानगरी। असे तेथ अशोक उपवन पाही। असे तेथेची शोकमग्न सीता।।९५।। असा तुम्ही परम बुध्दिमान। तैसेची वीर अन् शक्तिमान। जावे समुद्र पार करुन। होईल तुमचे कार्य सफल।।९६।। सांगे संपाती स्ववृत्तांत। आदर पूर्वक घेतले श्रीरामनाम। आले घडून अद्‌भूत नवल। आले संपातीस पुन्हा पंख।।९७।। होऊन हर्षित म्हणे रामभक्तांस। सांगतो सीतेचे स्थान तुम्हास। पाहू शकतो मी येथून तिज। कारण गिधाडदृष्टी असे माझी।।९८।। ऐकून संपातीचे ऐसे कथन। पाहुन ऐसा शुभशकुन। झाले ज्ञात सीतेचे स्थान। ऐकून हनुमान झाले प्रसन्न।।९९।। म्हणाला संपाती पुढे तयांस। आपण त्रिलोकी नाथ रामाचे भक्त। होईल आपुले कार्यसफल निश्चित। ऐसे म्हणून केले उड्डाण।।१००।।

श्री मारुतीदेवताचरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

ॐ वीर वीर महावीर। सात समुन्दर का सोखा नीर। शुत्र के नाम के ऊपर चौकी चढ़े।

हियो फोड़ चोटी चढ़े। सांस न आव्यो पडयो रहे। काया माहीं जीव रहे। लाल लंगोट तेल सिंदूर। पूजा मांगे महावीर। अन्तर कपडा पर तेल सिंदूर। हजरत वीर कि चौकी रहे।

ॐ नमो आदेश आदेश आदेश।

## ।।वशीकरणाध्याय।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री हनुमते नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

श्यामसुंदर श्रीरामचरणी वंदन। श्रीरामभक्त मारुतीस वंदन। होई तयांचे कृपे भवभयभंजन। भक्तवत्सल भक्ततारक ते।।१।। तयांचे वरदाने मारुती नवशती। सांगेन पुढील कथा मारुतीची। जाहले वानर अतिशय उत्साही। ऐकून संपातीचे कथन।।२।। निघाले उत्साहे उडया मारीत। अस्वल, वानर सारे आनंदित। समुद्रतटी आले अस्वल अन् वानर। घाबरले पाहुन समुद्राचे रुप।।३।। उसळती लाटा पर्वतप्राय। गर्जना लाटांची अतिभयंकर। जावे कैसे या समुद्राचे पार। झाले सकल बहुचिंतीत।।४।। अंगद म्हणे मग वानरांसी। असे कोणाची शक्ती ऐसी। जो उल्लंघून जाऊन सागरासी। पार पाडील आपुले कार्य।।५।। केले वर्णन सर्वांनी स्वसामर्थ्य। परी सागर असे बहु विशाल। अंगद म्हणे मी जाईन उल्लंघून। परी परत येण्याविषयी संशय असे।।६।। जांबुवंत म्हणती अंगदास। तू तर असशी सेनानायक। करावे आम्ही तुझेच रक्षण। तुज पाठविणे सर्वथा अनुचित।।७।। पाहती हनुमंताकडे

जांबुवंत। ऋक्ष राजास असे सारे ठाऊक। होता हनुमंतास ऋषिंचा शाप। त्यामुळे तो न जाणे स्वशक्ती।।८।। जाणीव शक्तीची करुन देण्यास्तव। म्हणाले तेव्हा जांबुवंत मारुतीस। आपण महावीर पवमानाचे पुत्र। घेतलाती जन्म श्रीरामकार्यास्तव।।९।। गती तुमची असे अविरोध। असे तुम्हा इंद्रादि देवतांचे वरदान। आहात तुम्ही परमशक्तिमान। हा सागर असे नगण्य तुम्हासी।।१०।। आता आपण उठावे तुरंत। जावे हा सागर लंघून त्वरीत। करुनी माता जानकीचे दर्शन। यावे परत येथे सुखरुप।।११।। ऐकून जांबुवंताचे ऐसे वचन। हनुमंत जे होते रामस्मरणी तल्लीन। जाहले त्यास स्वबळाचे स्मरण। उत्साहे केली तयांनी गर्जना।।१२।। म्हणे जाईन ग्रह नक्षत्रादि ओलांडून। करीन मी या सागराचे शोषण। संपूर्ण लंकेलाच या समुद्री बुडवून। आणीन मीच सीतामातेस येथे।।१३।। किंवा करु का मी लंकेचीच राख। बांधून आणू का राक्षसराज रावण। अथवा केवळ सीतेचे करुन दर्शन। संदेश देऊनी मी यावे परत।।१४।। जांबुवंत म्हणती मारुतीस। आहे आपला पराक्रम थोर। परी करुनी केवळ सीतेचे दर्शन। घेऊनी यावी वार्ता तेथील।।१५।। नंतर श्रीराम स्वतःच जाऊन। करतील स्वहस्ते रावणाचा वध। होईल त्यामुळे राक्षसकुलोध्दार। होईल रामाची कीर्ती विस्तृत।।१६।। श्रीरामप्रभुंच्या या कार्यास। देऊनी सहाय्य होऊ कृतार्थ। तुमचेनी अस्वल अन् कपीचे प्राण। करु तव

प्रतिक्षा आम्ही येथे।।१७।। झाले आंजनेय बहुप्रसन्न। केला त्यांनी पिता वायुदेवास प्रणाम। करुनी प्रभुरामचंद्राचे स्मरण। म्हणाले मग ते सर्वांसी।।१८।। रामनामानेच होई भवसागर पार। मी तर असे श्रीरामाचा दूत। त्यांची दिव्य अंगठी मज समीप। सहजची पार करीन समुद्रास।।१९।। पाहुन त्यावेळेचे मारुतीचे तेज। त्याचे बल, पराक्रम आविष्कार। करती समस्त देव 'जयजयकार'। करती सर्व ऋषी शांतीपाठ।।२०।। पवनगतीने निघाला हनुमान। करी सागर मनी विचार। निघाला मारुती श्रीरामकार्यास। द्यावी विश्रान्ती मध्येच त्यास।।२१।। सांगे सागर मैनाक पर्वतास। श्रीरामकार्यास्तव निघाला हनुमान। असे श्रीराम इक्ष्वाकु वंशीय। तुम्हासही असे तो पूजनीय।।२२।। आपणही करावे तया सहाय्य। उठून त्वरीत यावे जलाबाहेर। शिखरी तुमच्या करुनी विश्राम। जाईल आंजनेय पुढे कार्यास।।२३।। सुवर्ण मणिमय शिखरांसह। आला मैनाक समुद्रात बाहेर। करुनी मग मनुष्यवेष धारण। केली त्याने मारुतीस विनंती।।२४।। हे कपिश्रेष्ठ आपण पवनसुत। तुमच्या पूजे होई वायुदेवाचे पूजन। असे वायुदेव आम्हा वंदनीय। म्हणूनी तुम्हीही असा परमवंदनीय।।२५।। पूर्वी पर्वतांस होती गती। ते सतत सर्वत्र विचरती। तेणे त्रस्त होते देवता अन् ऋषी। झाला कुपीत सहस्राक्ष।।२६।। तयाने कापिले पर्वतांचे पंख। येऊ लागला तो मजसमीप। वायुदेवाने मज समुद्रात पाडून। वाचविले

देवेन्द्र वज्रा पासून।।२७।। ऐकून सारे म्हणे हनुमान। तुम्हा भेटून मी झालो प्रसन्न। परी मज जाणे असे त्वरीत। विश्राम करणे नसे मज शक्य।।२८।। तेंव्हा मैनाक आणि सागराने। मारुतीस शुभाशिर्वाद दिले। होऊनी मुदित मग हनुमानाने। घेतली श्रीलंकेकडे झेप।।२९।। पाहुन मारुतीस ऐसे जाता। देवतांनी प्रेषिली नागमाता सुरसा। देवताज्ञे धारण करी सुरसा। अत्यंत विक्राळ भयंकर रुप।।३०।। म्हणाली हनुमंतासी सुरसा। आहे मी अतीव क्षुधाक्रांता। तू येऊनी मम मुखान्तरी आता। करावे माझे क्षुधाशमन।।३१।। म्हणाला आंजनेय सुरसेसी। निघालो असे मी रामकार्यासी। येईन त्वरीत कार्यपूर्ण करुनी। देईन जानकी समाचार रामासी।।३२।। तदनंतर मी येऊन परती। करीन प्रवेश तव मुखान्तरी। तुझे क्षुधाशमन करीन निश्चिती। आता मजसी जाऊ द्यावे।।३३।। परी सुरसा न माने त्यास। म्हणे हनुमान कर मज भक्षण। बोलूनी ऐसे तिजसी वचन। होऊ लागला विशालकाय।।३४।। सुरसा होतसे त्याचेहून विशाल। हनुमंताने पाहीले।।३५।। मग मारुतीने करुनी विचार। करुनी अतिलघुरुप धारण। जाऊनी तिचे मुखान्तरी मग। आले बाहेरी अतीशीघ्र।।३६।। पाहुनी सुरसा झाली अतिप्रसन्न। आहात ज्ञाननिधी तुम्ही वायुनंदन। झाले ज्ञात आपुली मती आणि बळ। देवाज्ञे आले परीक्षा करण्यास।।३७।। आहात आपण खरेची बुध्दिमान। करावे जाऊन श्रीरामाचे कार्य। निश्चित होईल

कार्य सफल। असे पूर्ण आशीर्वाद माझा।।३८।। वायुवेगे पुढे निघाले मारुती। मार्गे भेटली सिंहिका राक्षसी। छाया ग्रहीणी ही राक्षसी। तिने पकडले मारुती छायेसी।।३९।। गेली रोधली मारुतीची गती। पाहे मारुती मग सभोवती। जेव्हा तयाने पाहीले खाली। दिसली तयास सिंहिका राक्षसी।।४०।। पाहुनी तिचे विक्राळ रुपासी। झाले विशालकाय मारुती। वेगे उडी मारली तिजवरी। झाली चूर्ण चूर्ण सिंहीका।।४१।। पाहुनी हनुमंताचे हे कार्य। करती स्तुती सर्व खेचर। धैर्य, समज, मती अन् कौशल। असती चारही गुण आपणापाशी।।४२।। होईल तुमचे कार्य पूर्ण। नसे तुम्हास अपयश भय। ऐकूनी वेगाने निघाले त्वरीत। येऊन पोहचले मारुती लंकेस।।४३।। पाहीले तयाने लंकेचे सौंदर्य। पाहीले दुर्ग अत्यन्त दुर्गम। असे रावणासवे युध्द निश्चित। म्हणूनी ज्ञात करावे येथील सर्व।।४४।। परंतु या वेषात दिवस प्रकाशात। होईल माझे आगमन विदीत। म्हणून निशासमयी लघुरुप घेऊन। करावा प्रवेश या दुर्गम दुर्गात।।४५।। उडी मारुनी चढला तो पर्वती। पाहीली सुदृढ दुर्गलंकानगरी। होते सागर तिचे चहुबाजुनी। तेणे होती अतिशय सुरक्षित।।४६।। सोन्याची तदबंदी अतिमजबूत। द्वारे तिची सुवर्णमण्डित। जागोजागी असती वने सुरम्य। सारे रस्ते स्वच्छ आणि सुंदर।।४७।। अति भयंकर अक्राळ विक्राळ सैनिक। जागोजागी होते रक्षणास सज्ज। देत होते पहारा सजग राक्षस।

सुरक्षा व्यवस्था होती कठोर।।४८।। होता सूर्यास्त मग हनुमान। करीतसे अतिलघु तनु धारण। करुनी श्रीरामाचे स्मरण वंदन। झाला प्रविष्ट लंकानगरीत।।४९।। लंकेची अधिष्ठाती देवता लंकिनी। पाहीले हनुमन्तास तिनी। म्हणे केलास प्रवेश या नगरी। तरी असे तव मृत्यु निश्चित।।५०।। हनुमन्ताने केला विचार मनी। जर आता केला विवाद मी। सुरु होईल युध्दच येथेसी। तेणे सीता शोध कार्यास होईल विघ्न।।५१।। म्हणूनी केला मुष्टीप्रहर तिजवर। रक्त उलटी करुनी पडली ती भूवर। परी सांभाळून स्वत:स त्वरीत। बैसिली लंकिनी उठून।।५२।। म्हणाली मग ती मारुतीसी। मिळेल विजय लंकेवर निश्चिती। सीतेमुळे रावणाचा अंत निश्चिती। होईल ऐसे ब्रह्मदेवे कथिले।।५३।। म्हणे लंकिनी प्रदीर्घ काळानन्तर। उजळले आज माझे भाग्य। आपण भवतारक श्रीरामभक्त। लाभली तुमची भेट मजसी।।५४।। पुन्हा धारण करुनी लघुरुप। जाहले पवनकुमार लंकाप्रविष्ट। व्याकुळ ते जगज्जननी दर्शन। घेऊ लागले तिचा शोध सर्वत्र।।५५।। पाहीली रावणाची अश्वशाला शास्त्रागार। गजशाला, छावणी, मन्त्रणगृह। होते फिरत ते सीता शोधार्थ। गच्ची कट्टयावरुन मारुती।।५६।। पाहीला राजवैभवयुक्त रावण महाल। होते सशस्त्र सैनिक रक्षक सज्ज। आले तेथून ते कुंभकर्ण भवनात। पाहीले इंद्रजित, जम्बुमाली, सुमालिंचे स्थान।।५७।। शोधीले प्रसिध्द राक्षसगृहांत। आले फिरुनी

रावण महालात। पाहुनी रत्नजडित पुष्पक विमान। झाले पवनकुमार थोडे चिन्तित।।५८।। आला मारुती अंतःपुरात। होत्या हजारो सुंदरी आभूषणभूषित। होत्या झोपल्या त्या अस्ताव्यस्त। पाही मारुती निरखून त्यास।।५९।। पाहीली या सर्वांहून अतिशय सुंदर। अंगकांती होती दिव्यसुंदर। होती सुवर्ण रत्नजडित भूषणे अलंकृत। होती ती रावणपत्नी मंदोदरी।।६०।। गेली रात्र ऐसीच संपून। आला ब्राह्म मूहुर्त समीप। पाहुनी एक विचित्र भवन। जाहले पवनकुमार आश्चर्य चकित।।६१।। होते सुशोभित देवालय त्यात। होत्या भिंती रामनामांकित। होती तुळसी पुष्पवाटीकेत। वाटले मारुतीस अति आश्चर्य।।६२।। झाला होता ब्राह्म मुहुर्त। उठले विभीषण अंथरुणातून। करु लागले श्रीरामनाम स्मरण। झाले पवनपुत्र आश्वस्त।।६३।। जाणले त्याने हे तर भगवत् भक्त। धारण केला मारुतीने ब्राह्मण वेष। घेऊ लागले ते मुखाने रामनाम। ऐकून आले विभीषण बाहेर।।६४।। केले त्यांनी वेषधारी मारुतीस वंदन। आदरपूर्वक विचारिला परिचय। म्हणे मी पवनकुमार हनुमान। सीतेचा शोध घेण्या आलो येथे।।६५।। परस्पर मुखातून ऐकून रामनाम। उभय ही रामभक्त हे जाणून। विभीषण मग म्हणती तयास। असे मी रावणानुज अधम विभीषण।।६६।। असे मी तामसी राक्षसकुलोत्पन्न। असे मी दीनहीन असहाय्य। असतील मजवर अनन्यशरण प्रसन्न। तेणे कारणे घडले तव दर्शन।।६७।।

म्हणाले हनुमान विभीषणास। आहात आपण परम भाग्यवंत। लाभली आपणा रामभक्ती सहज। म्हणुनीच आहेत श्रीराम प्रसन्न।।६८।। पहावे आपणच माझे कुल। असे मी एक नीच चंचल वानर। तरीही लाभला श्रीराम वरदहस्त। झाली भेट आपणासवे।।६९।। आता माझी विनंती एक। सांगावे मज जानकीचे स्थान। घेऊनी जानकीमातेची भेट। असे जाणे मज झडकरी।।७०।। विभीषणाने सांगितले तयास। असे अशोक वाटीका राजसदना समीप। असे तेथे निर्मळ जल सरोवर। तटावरती असे शिवमंदिर।।७१।। शिवमंदिरा समीप असे एक। घनदाट उंच अशोकवृक्ष। त्या वृक्षाच्या खाली बैसली तेथे। परम दु:खित जनकनन्दिनी।।७२।। केला असे तिने अन्न, जल त्याग। झाले असे तिचे शरीर काष्ठवत। भिवविती राक्षसी रात्रंदिन तिज। व्याकुळ विरही असहाय्य सीता।।७३।। ऐकुनी सीतेची ऐसी दुर्दशा। झाला बहुशोक हनुमंतास। निघाला सत्वर तो तेथून। आला तो अशोक वाटिके समीप।।७४।। आला मारुती अशोक वृक्षावर। पाहीले तेथून त्याने सतीस। बसली होती बिचारी अश्रु ढाळीत। तिच्या दर्शने झाला तयास मोद।।७५।। म्हणे मारुती आज जाहलो कृतार्थ। जाहला माझा जन्म सफल। लागला सीतेचा शोध मज। करीन मी श्रीरामकार्य पूर्ण।।७६।। परी ऐकून तेव्हा कोलाहल। लपला मारुती अशोक पर्णांत। सुंदर स्त्रियांसमवेत रावण। येत होता तो जानकीकडे।।७७।।

येऊन म्हणाला सीतेस रावण। असशी तू प्राणाहून प्रिय मज। पती तुझा वनवासी दीन असहाय्य। देई सोडूनी तू त्यास।।७८।। मी असे त्रैलोक्य - विजयी। भिती मज देवता असुर नागादि। मनुष्याचा काय पाड मज पुढती। इथे येणे ही अशक्य रामास।।७९।। स्वीकारी सीते तू मजसी। देव गन्धर्व यक्षादि स्त्रिया सर्वही। नित्य करतील सेवा तुझी। होशील तू माझी पट्टराणी।।८०।। म्हणाली सीता रावणास। असशी तू अधम राक्षस। नसता तेथे माझे प्राणनाथ। आणीलेस तू मज पळवून।।८१।। असशी नीच अतिशय मूर्ख। मिरवीशी प्रौढी तू मजसमोर। येतील येथे माझे प्राणनाथ। होईल लंका जळून खाक।।८२।। ऐकून क्रोधीत झाला दशानन। निघाला सीतेवर करण्या वार। मन्दोदरीने निवारीले त्यास। क्रोधे म्हणाला तो सीतेस।।८३।। देतो समय एकमास मी तुज। करी तू चिंतन विचार मनात। तरीही जर न होशी वश मज। ठारच मारीन मी तुजसी।।८४।। गेला रावण मग तेथून निघून। आल्या राक्षसी विक्राळवदन। भिववू लागल्या त्या सीतेस। झाला क्रोधीत पवनात्मज।।८५।। झाली जागृत राक्षसी त्रिजटा। बोलावून म्हणे ती राक्षसींना। पाहीले महाभयंकर स्वप्न आता। असे ते दशानन विनाश सूचक।।८६।। पाहीला मी एक तेजस्वी वानर। लाविली त्याने लंकानगरीस आग। पाहीले पहाटे पहाटे हे स्वप्न। नक्कीच ते लवकर होईल सिध्द।।८७।। तेंव्हा तुमची गती काय

होईल। करा तुम्हीच आता सम्यक विचार। द्या तुमचे भयंकर कृत्य सोडून। जावे शरण जनकनन्दिनीस।।८८।। गेल्या राक्षसी सीतेस शरण। त्रिजटेस म्हणे सीता व्याकुळ। आणावी सुखी लाकडे जाऊन। करीन मी आता अग्निप्रवेश।।८९।। पाहुनी दुरावस्था सीतेची। मधुरस्वरात म्हणे सूक्ष्मरुपधारी। होता दशरथ राजा पराक्रमी। असती चार पुत्र तयासी।।९०।। आपुले पितृवचन पाळण्यासाठी आले श्रीराम सलक्ष्मण वनी। होती समवेत जनकनन्दिनी। नेले रावणे पळवून तिजसी।।९१।। शोध घेत आले ऋष्यमूक पर्वती। सुग्रीवासह मैत्री केली त्यांनी। एक बाणे वधिला वीरश्रेष्ठ वाली। दिधले सुग्रीवास किष्किन्धाराज्य।।९२।। झाले सारे अस्वल, वानर मैत्र। सुग्रीवे देऊ केले सहाय्य। पाठविले सर्वांस सीता अन्वेषणार्थ। असे मी सुग्रीव सचीव वानर।।९३।। ऐकून तयाचा स्वर मधुर। म्हणे सीता व्हावे प्रकट समोर। असा श्रीराम भक्त खरोखर। म्हणूनीच आला असा येथे।।९४।। पाहीली आपण माझी दुर्दशा। निवेदन करावी रामासी कथा। सांगावे दीनदुःखी तव कांता। यावे आपण आता झडकरी।।९५।। आला हनुमंत खाली उतरुन। दिली अंगठि त्याने सीतामातेस। पाहुनी सीता झाली आनन्दित। दिला मारुतीस तिने आशीर्वाद।।९६।। म्हणे मी असे दीन असहाय्य। कैसे आहेत माझे रघुवीर। सांगे मारुती मग तिज। परम दुःखी व्याकुळ आहेत

राम।।९७।। तुमच्या विरहे आहेत उदास। कुणापुढे व्हावे त्यांनी व्यक्त। म्हणती माझे प्रेम जाणे मम हृदय। वेदना माझ्या शब्दतीत।।९८।। ऐकून आश्वस्थ झाली सीता। म्हणाली मग पवनसुता। करावी निवेदन माझी व्यथा। अतिशय आतुर मी येथे।।९९।। असे येथे मी अति दु:खित। नसे मजकडे आता समय। तरी आपण येथे येऊन त्वरीत। रावणवध करुन करावे मज मुक्त।।१००।।

श्री मारुतीदेवता चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

ॐ हनुमान पहलवान। वर्ष बारह का जवान। हाथ में लडडू मुख में पान।<br>
आओ आओ बाबा हनुमान, वश मे करे जहाँ। महादेव गौरा पार्वती की।<br>
शब्द साँचा पिंड काँचा। फुरो मंत्र ईश्वरो वाचा।

## ।।अध्याय पाचवा।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री हनुमते नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

मंगलकारी सुदर्शनधारी श्रीकांता। तुम्हीच असा सर्वांचे पालनकर्ता। रक्षिण्यासी सुष्टांशी दयावंता। घेतले भूवरी विविधावतार।।१।। मातला जेव्हा दशानन। करण्या दशाननाचे हनन। केला मनुष्यावतार धारण। दशरथाचा पुत्र होवोनी।।२।। जनक नन्दिनी आपुली कांता। जगज्जननी ती थोर माता। दशाननाने पळवूनी नेली सीता। झालात आपण सज्ज युध्दास।।३।। नमुनी विनम्रभावे तुम्हास। सांगेन रामभक्त मारुती कथेस। मारुती तुमचा दासानुदास। लाभे अमृतगोडी शब्दांस।।४।। निघाला हनुमंत निरोप घेऊनी। देई आशीर्वचन जगज्जननी। आला अशोक वाटिकेत तेथोनी। करु लाभला भक्षण तेथील फळे।।५।। परीक्षीण्या रावणाचे रक्षाबल। लागला विध्वंसु वाटिका सकल। धावून आले रक्षक तेथील। मारुतीने त्यांस मारुन टाकले।।६।। केला अशोक वाटिकेचा विध्वंस। चढूनी बैसला तो प्रासादावर। केली त्याने गर्जना भयंकर। धावले राक्षसवीर शस्त्रे घेऊन।।७।। सकलांस

मारीले मारुतीने। काही गेले धावून रावणाकडे। म्हणती भयंकर वानर आला असे। विध्वंसिली त्याने वाटिका समस्त।।८।। ऐकून रावण झाला कोपायमान। पाठविली सेना करुनी सज्ज। आले समस्त मारण्या मारुतीस। मारुतीने तयांसी टाकले मारुन।।९।। आता आला जम्बुमाली विशालकाय। होता जम्बुमाली युध्दात अजय। क्रोधे धावुनी गेला हनुमंतावर। हनुमंताने त्यालाच केले ठार।।१०।। होते मंत्रिपुत्र अत्यंत तेजस्वी। होते पराक्रमी आणि धैर्यशाली। त्या सात वीर मंत्रिपुत्रांसी। रावणाने धाडीले युध्दास।।११।। पाहुनी तयांसी मग हनुमान। केली तयाने गर्जना भयंकर। केले तयांवर जोरदार आक्रमण। केले धराशायी क्षर्णार्धात तयांसी।।१२।। ऐकून वार्ता भयभीत रावण। पाठविले पाच सेनापती महान। मारुती करी पर्वतप्राय रुप धारण। केली गर्जना भयंकर दारुण।।१३।। पाहुनी तयांचे ऐसे महाकाय रुप। दारुण भीषण गर्जना ऐकून। भीतीनेच झाले पाचही निष्प्राण। क्षणात मारुतीने ठार मारीले त्यांसी।।१४।। यानंतर रावणपुत्र अक्षकुमार। निघाला उत्साहे रथारुढ होऊन। केले हनुमंतावर वेगे आक्रमण। हनुमंताने रथावर मारली उडी।।१५।। रथ, अश्व, सारथी पाडले भूवर। अक्षकुमार करीतसे शस्त्रप्रहार। उडाले हनुमान आकाशी तितुक्यात। धावला अक्षकुमार त्याचे पाठी।।१६।। मारुतीने उचलले पकडून पाय। फिरविले आकाशी गरगर। फेकले आकाशातून

भू वर। झाला तयाचा चकनाचूर।।१७।। ऐकूनी वार्ता बहु दु:खी रावण। क्रोधे निघाला लढण्या आपण। परी पुत्र इन्द्रजीत म्हणे त्यास। मी असता चिंता कशाची।।१८।। निघाला इन्द्रजीत युध्दास त्वेषे। आला गर्जतच हनुमानाकडे। मारुती लोहखांबासह आकाशी उडे। विध्वंसून रथ सारथीस मारीले।।१९।। इंद्रजीताचे सैनिक धारातीर्थी। इंद्रजीत विचार करुन मानसी। सोडीले मारुतीवर ब्रह्मास्त्रासी। झाला बध्द मारुती ब्रह्मास्त्र पाशी।।२०।। इंद्रजीताने पकडून पवनसुतासी। रावण सभेत आणीले तयासी। अद्‌भूत वैभव, शक्ती रावणाची। मारुती म्हणे रावण सत्यची तेजस्वी।।२१।। रावण सांगे मग प्रहस्तासी। तुम्ही विचारावे या वानरासी। का केले उध्वस्त अशोक वाटिकेसी। सैनिक, पुत्र का मारीले याने।।२१।। प्रहस्ते विचारता म्हणे हनुमान। असे माझा स्वामी श्रीराम। त्यांच्या आज्ञे चाले हे जग महान। ब्रह्मा - विष्णु - शंकर मानिती त्यासी।।२३।। परम प्रतापी रामाचा मी दूत। क्षणात तयाने तोडीले शिव - धनुष्य। मारीले त्रिशीरा आणि खर, दूषण। असती महान पराक्रमी श्रीराम।।२४।। मारतील राय तुज क्षणार्धात। नसे ठाऊक तुज त्यांचा पराक्रम। त्यांचे अपरोक्ष केलेस सीता हरण। लढण्याचे सामर्थ्य नसे तुज जवळ।।२५।। त्रिभुवन स्वामी श्रीरामाचा मी दूत। असे प्रतापी पवनदेवाचा सुत। नसे मज इथे कोणाचेही भय। रक्षणकर्ता माझे स्वयं

श्रीराम।।२६।। आलो येथे त्यांचे आज्ञेवरुन। घेतले मी सीतामाईचे दर्शन। झालो परम क्षुधित म्हणून। भक्षिली अशोकवाटिकेतील फळे।।२७।। मी वानर अतिशय चंचल। तोडीले वृक्ष मम स्वभावानुसार। नसे माझा यात काही अपराध। तुझे सैनिके अडविले मज।।२८।। म्हणूनी मी वधिले तयांस। पाठविले तुची अक्षकुमारास। आला तो मजसमोर लढण्यास। म्हणूनी मी केला वध तयाचा।।२९।। ऐकून रावण जाहला कुपित। चावु लागला तो दंते ओष्ठ। म्हणे शांतपणे हनुमान तयास। आपण असा महान विश्रवाचे पुत्र।।३०।। आपले बाह्यरुपी स्वरुप असुर। परी अंतरी आत्मा, प्राण, निर्मळ। द्यावी सोडून देहबुध्दि,अहंकार। जावे शरण श्रीरामासी।।३१।। जगन्माता सीतेस परत देऊन। धरावे तुम्ही श्रीरामाचे चरण। श्रीराम असती अनन्यशरण। लाभेल मोक्षसुख आपणास।।३२।। सांगे हनुमान हीतोपदेश। रावण भववश दुर्बुध्दी राक्षसराज। त्यामुळे रावण झाला अधिक कुपित। म्हणे मी तुलाच मारीन ठार।।३३।। तुजला मारीन हे वानराधम। मारीन श्रीरामास सलक्ष्मण। मारीन सुग्रीवास सैन्यासहित। सीतेसहीत करीन सर्वांचा नाश।।३४।। ऐकून ऐसी दशाननाची दर्पोक्ती। हनुमान तेंव्हा तयास म्हणती। अधमा नसे ठाऊक माझी शक्ती। अरे, मी तर असे श्रीराम सेवक।।३५।। ऐकून पवनकुमाराचे ऐसे वचन। क्रोधे लाल झाला दशानन। म्हणे सैनिक हो यास पकडून। टाका

करुन वध या वानराचा।।३६।। उभयतांचा वार्तालाप ऐकून। दशाननास म्हणे बंधु विभीषण। शास्त्र लोकनीती जाणता आपण। दूताचा वध करणे नसे योग्य।।३७।। असो दूत वाईट वा चांगला। शत्रुने जरी पाठविले तयाला। परी नसे स्वाधिनता दूताला। म्हणूनी तो सर्वक्षा रक्षणीय असे।।३८।। देणे मृत्युदंड सर्वथा निंदय। वाटल्यास करावे शासन अन्य। बंधुवचन ऐकून म्हणे दशानन। आपले वचन असे उचित।।३९।। नाही देणार यास मृत्युदंड। परी करीन यास नक्कीच शासन। असे वानरांस पुच्छा अतिप्रिय। जाळावे या वानराचे शेपूट।।४०।। मिरवा नगरातून करुनी लज्जित। रस्त्यारस्त्यांतून फिरवावे यास। काढावी धींड गल्ली बोळातून। नंतर लावावी शेपटीस आग।।४१।। ऐकून आपल्या राजाचा आदेश। धावले सर्व सैनिक राक्षस। चिंध्या, वस्त्र, बुडवून तेलतुपात। लागले गुंडाळु मारुती शेपटीस।।४२।। केली पवनात्मजाने शेपूट लांब। लागली वाढू क्षणाक्षणास। गुंडाळली लंकेतील सर्व वस्त्र। टाकले सर्व तेल तूप शेपटीवर।।४३।। मिरवून मारुतीस रस्त्यारस्त्यांतून। चार रस्त्यावर आले घेऊन। दिली मग त्याची शेपूट पेटवून। हर्षोल्हासाने सर्व नाचू लागले।।४४।। केले मारुतीने लघुरुप धारण। झाली सैल शेपटीची बंधन। मग फिरुन मोठेरुप धारण करुन। फिरवू लागला तो शेपटीस।।४५।। शेपटीने तो ताडीतसे सर्वांस। लागले पळू भिऊन सर्व राक्षस। होता शेपटी प्रहार

जोरदार। होऊ लागले राक्षस भस्मसात।।४६।। झाले सर्व राक्षस भयभीत। मारुती देत होता लंका पेटवून। सर्वत्र धुमाकुळ माजवून। राहीला उभा जाऊन गच्चीवर।।४७।। राक्षसीने सांगितले सीतेस। लावली आग मारुती शेपटीस। ऐकून सीता झाली भयभीत। करीतसे असे अग्निदेवास विनंती।।४८।। अग्निदेवा, मी असेन जर पतिव्रता। असेन मी पतीची शुध्द सेविका। जर असेल सफल मम तपस्या। हनुमंतासाठी व्हावे शीतल।।४९।। लंका नगरी जळता पाहून। मारुती करीतसे मनी विचार। शेपटीच्या अग्निचा मज नसे ताप। काय असावे याचे कारण।।५०।। मग म्हणे मारुती स्वत:स। मी तर असे श्रीरामाचा सेवक। असे जगन्माता सीतेचा आशीर्वाद। त्यामुळे मी असेन सुरक्षित।।५१।। चढला हनुमंतास अजुन उत्साह। लागला फिरु महला महलांवरुन। दिली राजवाडयासह लंका पेटवून। लागली जळू समस्त लंका।।५२।। अग्नि थैमान पाहूनी आले। रावणाकडे मेघनाद अन् मंत्रि सारे। नगरीत गच्चांवर पाहू जेथे। भयानक हनुमान तेथे दिसे।।५३।। ऐकून तयांचे ऐसे विवश बोलणे। लोकपाल आणि यम जे रावणबंदी होते। रावणाने तयांस धाडले मारुतीकडे। यमाला मुखात ठेवीले मारुतीने।।५४।। यमदेवाच्या ऐशा अनुपस्थिती मुळे। पृथ्वीवर कार्यच बंद पडले। यमाविना मृत्युच बंद झाले। मग ब्रह्मादि मारुतीस विनविती।।५५।। ऐकूनी ब्रह्मादि देवांची विनंती। यमास मुक्त

करिती मारुती। यमाने मग संकल्प केला मनी। राम - भक्तांसमीप जायचेच नाही।।५६।। रावणाने मग होऊन हताश। दिली आज्ञा मग पयोधरांस। पयोधर घनघोर करुनी वर्षाव। झाला त्याचा उलटाच परीणाम ।।५७।। पाण्याच्या मुसळधार धारा बरसती। तेलतुपासम त्या अग्नी प्रज्वलित करती। सारे राक्षस मोठे आश्चर्य करती। म्हणती ऐसे कधी घडलेच नाही।।५८।। पाहून ऐसे सारेच अद्‌भूत। म्हणती मंत्री मग दशाननास। ईश्वर प्रतिकुलतेचेच हे फळ। जळत्या लंकेस नसे रक्षक।।५९।। मनातल्या मनातच मग हनुमान। करीतसे श्रीरामाचे स्मरण। मर्कटाचे ऐसे नवलकार्य पाहून। देवता, मुनी, गन्धर्वादि झाले प्रसन्न।।६०।। रावणे शनीस केले होते बंदी। मारुती प्रहारे पडल्या बंदीगृह भिंती। रावणाचे दुष्कृत्य कथिले शनिसी। शनि म्हणे आला रावणनाश समीप।।६१।। विभीषणाचे घर वगळून। गेली समस्त लंका जळून। झाले मारुतीस सीता स्मरण। परमचिंतीत तो झाला।।६२।। मारुतीने मारीली समुद्री उडी। शेपटीची आपुल्या आग विझविली। नंतर पवनकुमार आले बाहेरी। पाहीले महात्मा चारणास।।६३।। सांगत होते महात्मा चारण। पवनपुत्रे केले लंकादहन। परंतु यातही असे एक नवल। जानकी पर्यंत दाह पोहचला नाही।।६४।। आला हनुमान मग सीतेपाशी। होती चिन्तीत मारुती विषयी। भक्तिने मारुती पडला सीताचरणी। तिने शिरी ठेविला वरदहस्त।।६५।।

म्हणे सीता हनुमानासी। तुजला त्रास झाला नाही ना काही। मारुती तिज वदे लवलाही। आपल्या वरदहस्ते मज रक्षिले।।६६।। झाले माझे इच्छित कार्य समस्त। जाणे मज स्वामींकडे तुरंत। कृपया द्यावी आता आज्ञा मज। सांगीन जाऊन मी समाचार।।६७।। सीता म्हणे आंजनेयासी। असशील थकला घे विश्रान्ती। नंतर जाशील स्वामींप्रती। वाटे ऐसे माझे मनासी।।६८।। म्हणे मारुती आता न विश्राम। करणे असे कार्य महान। मजसी असे आपले वरदान। जाईन मी त्वरीत परती।।६९।। सीता म्हणाली मारुतीसी। सागर ओलांडण्याची शक्ती। असे केवळ तीघांचेच ठायी। तू, गरुड आणि पवन असा समर्थ।।७०।। कैसे येतील मग समस्त येथे। ऐसे पडले मम मनास कोडे। मी एक तुच्छ वानर मारुती म्हणे। असे अपार श्रीरामाची शक्ती।।७१।। त्यांच्याच शक्तीने गरुडास लाभे। पवनासही शक्य त्यांच्या वरदाने। त्रिभुवनात श्रीरामास अशक्य काही नसे। पंगु लंघी गिरीवर त्यांच्या कृपे।।७२।। ऐकून ऐसे पवनात्मजाचे वचन। झाला सीतेस संतोष परम। म्हणे सांग तू माझ्या स्वामीस। शीघ्र येऊनी करावा उध्दार।।७३।। मग मारुतीने केली विनंती। प्रभुंनी दिली होती त्यांची अंगठी। आपणही चिन्ह द्यावे मज काही। देईन जाऊन ते श्रीरामासी।।७४।। दिला सीतेने आपुला चुडामणी। निघाला मारुती तो घेऊनी। आला अरिष्ट गिरिवर उडूनी। केली भयंकर गर्जना त्याने।।७५।। घनघोर गर्जना

घुमली वातावरणी। घेतली मारुतीने उत्तरेस उडी। भये थरथरा लंका कापू लागली। झाले पर्वतांचे तुकडे - तुकडे।।७६।। मार्गी स्पर्श करुनी मैनाकास। निघाला बाणाप्रमाणे भर वेगात। महेन्द्रपर्वती येऊन पोहोचताच। हर्षे मारुती करी गर्जना।।७७।। ऐकून त्याची ऐसी गर्जना। झाला मोद अस्वल, वानरांना। समजुन आले त्या सर्वांना। केले मारुतीने कार्य सफल।।७८।। उतरला मारुती महेन्द्र गिरीवर। जमले भोवती सारे अस्वल, वानर। हर्षे मारुतीने सांगितले तयांस। लाभले मज सीतामातेचे दर्शन।७९।। ऐकून शुभ समाचार ऐसा। जांबुवंते मारीली मिठी मारुतीला। सद्‌गदीत होऊन म्हणाला तयाला। वाचविलेस तू सर्वांचे प्राण।।८०।। सांगे मग हनुमान तयांना। केला विध्वंस अशोक वाटिकेचा। मारले अक्षकुमारादि राक्षसांना। आला मग मेघनाद युध्दाला।।८१।। केला त्याने ब्रह्मास्त्र प्रयोग। झालो मी आपणहून त्यात बध्द। गेलो मेघनादासवे राजसभेत। घेतले दशाननाचे दर्शन।।८२।। झाला होता तो कोपायमान। केला मी त्याच्यासवे वार्तालाप। गेला वाढत त्याचा संताप। म्हणे मारा ठार या वानराला।।८३।। परी विभीषण हा दशाननबंधु। असे थोर न्यायी मुत्सद्दी कुशलु। म्हणे सर्वथा अवध्य असे दूतु। यासी मृत्युदण्ड देऊ नये।।८४।। ऐकून रावणे केला स्वीकार। म्हणे द्यावा यास दंड भयंकर। म्हणे वानरांस प्रिय असे शेपूट। याच्या शेपटाचे करावे दहन।।८५।। बुडवून

चिंधीवस्त्रे तेलातुपात। गुंडाळती ते माझ्या शेपटीस। लांब वाढविली मी शेपूट। लंकेतील चिंध्यावस्त्रे संपली।।८६।। मग ओतून आणखी तेलतूप। मिरीवले मज नगरातून। एका चौरस्त्याशी आणून। दिली माझी शेपूट पेटवून।।८७।। प्रभुकृपे न जाळी अग्नीमज। मीच जाळीली लंका समस्त। बसली दहशत राक्षसांचे मनात। झाले भयभीत लंकावासीय।।८८।। अंगद म्हणे तू परम भाग्यवान। लाभले तुज सीतामातेचे दर्शन। ही शुभवार्ता ऐकून श्रीराम। होतील निश्चितची प्रसन्न।।८९।। निघाला हनुमानासवे समुदाय। अस्वल वानरादि मोदे उडया मारीत। आले ते मधुबना समीप। झाले सारे फळ खाण्या आकृष्ट।।९०।। दधिमुखाने सांगितला मधुवन वृत्तान्त। ऐकून सुग्रीव झाले प्रसन्न। म्हणे सांगावा तयांसी निरोप। यावे त्वरीत त्यांनी श्रीरामाकडे।।९१।। ऐकून दधिमुखाकडून निरोप। जांबुवंत, अंगद, मारुती करती उड्डाण। विशाल काय वानरां समवेत। समस्त निघाले प्रस्रवण गिरीकडे।।९२।। दुरुनच त्यांना येताना पाहून। म्हणती सुग्रीव श्रीरामास। लागला यांसी सीतेचा शोध। म्हणूनच असती सारे प्रसन्न।।९३।। असे हनुमान परम बुध्दिमान। असे तैसाची बहुशक्तिमान। असे हनुमानास शास्त्रज्ञान। असेल केले कार्य त्यानेच पूर्ण।।९४।। पाहुनी लक्ष्मण अन् श्रीरामास। आले खाली उतरुन समस्त। त्यांनी सुग्रीव अन् श्रीरामास। केला विनम्रपूर्वक प्रणाम।।९५।। म्हणाले श्रीरामास मग

हनुमान। घेतले मी सीतामातेचे दर्शन। करीत असे ती कठोर व्रतपालन। असे परी शरीराने सकुशल।।९६।। ऐकुन हनुमंताचे ऐसे वचन। भरुन आले सर्वांचे नयन। परी नंतर दुःख आवरुन। राम सीतेचा समाचार पूसती।।९७।। सांगे समाचार मग मारुती। लंकेचे वर्णन, तेथील स्थिती। म्हणे घेतली मी रावणभेटी। केले दहन मी लंकेचे।।९८।। मारुतीने रामास दिला चूडामणी। झाले सद्गदीत श्रीराम पाहुनी। आमुच्या विवाहाचे समयी। राजा जनकाने तिज दिला होता।।९९।। झाले श्रीराम बहु प्रसन्न। ठेविला मारुतीचे शिरी कर। दिले मारुतीस आशीर्वचन। झाला परमानंद मारुतीसी।।१००।।

श्री मारुतीदेवता चणार्पणमस्तु। श्री स्वामीसमर्थ चरणार्पणमस्तु।

ओम नमो महावीर,हनुमन्त वीर धाय-धाय चलो, अपनी मोहिनी चलाओ
शत्रु के नैन बाँध, मन बाँध, काया बाँध, घर बाँध, द्वार बाँध
मेरे लिये ना बाँधे तो मेरी आण मेरे गुरु की आण, छु वाचापुरी

## ।।संजिवनाध्याय।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री व्यंकटेशाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

जगज्जननी सीता माऊली। करावी मजवर कृपासावली। नम्र विनंती आपुले चरणी। द्यावे वरदान मजसी आता।।१।। मारुतीचा ऐकून प्रताप। घेतले तयासी श्रीरामाने कवेत। भक्त भगवंताची अपूर्व भेट। पाहुनी हर्षित झाले सकल।।२।। म्हणे हनुमान श्रीरामास। वर्णिला सीतेस होणारा त्रास। सांगे रावण दिधला एकमास। तत्पूर्वी कार्य करावे आपण।।३।। लंकेवरती करणे आक्रमण। असे हे कार्य बहुत कठीण। चहुबाजुंनी वन नदी दुर्गम। आहे स्थित समुद्राचे दक्षिण तटावर।।४।। प्रचंड वीर अडदांड राक्षस। असती चहु द्वारांवरती स्थित। हत्ती घोडे आदिंनी सुरक्षित। असे दशाननाची लंका नगरी।।५।। परंतु केवळ आपुल्या कृपेने। केले समाप्त मी सारे अडथळे। केली नष्ट लंकेची दृढबंदी, द्वारे। केली मी तटबंदी उध्वस्त।।६।। मारीली विशाल राक्षसी सेना। टाकीली जाळूनी समस्त लंका। भये ग्रासले असे सर्वांना। असे दहशत सर्वांचे मनी।।७।। असे भय नागरीकांच्या

मनी। भितीने ग्रस्त सेना सारी। पाहून दशाननाच्याही मनी। असे दरारा आपुल्या विषयी।।८।। झाले असे शत्रुबल न्यून। असे आपणा विनंती विनम्र। करावे अविलम्बे आक्रमण। वाटे असे माझे मनासी।।९।। ऐकून ऐसे हनुमंताचे कथन। जाहले रघुवीर अति प्रसन्न। देऊनी हनुमंतास आशीर्वचन। म्हणाले सुग्रीवादि सर्वांसी।।१०।। हनुमन्ताने जे केले कार्य पूर्ण। देवतांसही करणे ते कठीण। या पृथ्वीतली असे अन्य कोण। जाऊ शकेल समुद्र लंघून।।११।। गेला हनुमान समुद्र लंघून। चातुर्ये केले लंकेवर आक्रमण। सुरक्षित लंकेचे करुनी दहन। निभावला तयाने सेवाधर्म।।१२।। असा बुध्दिमान शौर्यशाली। नसे जगती अन्य कोणी। त्याने जानकीचा शोध करुनी। केले मज अन् आपणांस उपकृत।।१३।। श्रीरामे आज्ञापिले सुग्रीवासी। या शुभ विजय मुहुर्ताच्या समयी। करावे प्रस्थान युध्द यात्रेसी। तेणे होईल प्राप्त विजय।।१४।। दिली आनंदे सुग्रीवाने आज्ञा। निघाली कोटी कोटी वानरसेना। मधोमध शोभे श्रीराम सलक्ष्मण। मारुती अंगदाच्या खांद्यावरी।।१५।। पाहुनी या सेनेचे सौभाग्य। करती प्रशंसा इंद्रादि देवगण। निघाले पार करुन मलयाचल। अविश्रान्त पार केले संहयाद्रिसी।।१६।। आले सर्व सागराच्या तटी। आनंदे अस्वल वानर गर्जना करती। ऐकून ऐशा गर्जना कोटी कोटी। महासागर गर्जना वाटे छोटी।।१७।। झाले राक्षस राक्षसीणी चिन्तीत। एका वानरे केली लंका उध्वस्त।

येता ऐसे कोटयानुकोटी वानर। काय अवस्था होईल लंकेची।।१८।। मिळाली वार्ता दशाननास। झाला होताच मनातून भयभीत। पाचारिले त्याने मंत्रिगणांस। विचार विनिमय करण्यासाठी।।१९।। म्हणती काही दशाननास। आपुल पराक्रम आणि बळ। काय करतील हे अस्वल वानर। चिन्ता मुळी न करावी।।२०।। परी रावणानुज विभीषण। म्हणे तो दशाननास वचन। एका वानरे केले लंकेचे दहन। मारले तयाने अनेक राक्षस।।२१।। नसती श्रीराम कुणी सामान्य। असती ते नारायणदेव प्रत्यक्ष। सीता भगवती लक्ष्मी साक्षात। हे असे संकट लंकेवरती।।२२।। म्हणूनी आपण करुनी विचार। द्यावे सीतेस सन्मानाने परत। तेणे श्रीराम होऊनी संतुष्ट। करतील क्षमा आपणासी।।२३।। अन्यथा असे प्रसंग कठीण। सुटता श्रीरामाचा अमोघ बाण। न वाचवू शकेल शक्र यमराज। असेल सदाशिवही असहाय्य।।२४।। ऐकून विभीषणाचे बोधवचन। रागे लाल झाला दशानन। विभीषणास मारुती लाथ। म्हणे करीसी शत्रुची प्रशंसा।।२५।। नसे तुज लाज वा शरम। खाऊनी येथे माझेची अन्न। बोलीसी ऐसे दुष्ट वचन। जावे तूची रामाकडे।।२६।। माझ्या भये कापे त्रैलोक्य। करु पाहसी मज भयभीत। तुझे जागी जर असता अन्य। तात्काळ वध मी केला असता।।२७।। ऐकूनी रावणाचे कठोर वचन। साहुनी दशाननाचा लत्ताप्रहार। केला बिभीषणाने त्यास प्रणाम। गदा घेऊनी उडाला

आकाशी।।२८।। आले चार मंत्री तया समवेत। आले उत्तर तटी समुद्रावरुन। तयांसी ऐसे येताना पाहून। वानरांस वाटे असेल रावणदूत।।२९।। जाणून रावणबंधु विभीषण। तयास वानरांच्या पहाऱ्यात ठेवून। आला सुग्रीव जेथे श्रीराम। म्हणे आला असे रावणबंधु।।३०।। रावणाचा बंधु विभीषण। आला आपुल्या भेटी लागून। राक्षस कपटी मायावी अत्यन्त। द्यावे तयास कठोर शासन।।३१।। परी हनुमन्तास होते ठाऊक। असे विभीषण श्रीरामभक्त। केले होते सहाय्य त्यानेच। सीतेचा पत्ता त्यानेच सांगितला।।३२।। याच विभीषणाने रावण सभेत। हनुमानाची बाजू मांडून। केला होता हनुमानाचा बचाव। मृत्युदण्डा पासूनची।।३३।। आता आपले सर्वस्व त्यागुन। असे आला तो श्रीराम शरण। तयाचा भावे स्वीकार करुन। द्यावा आश्रय विभीषणासी।।३४।। तेंव्हाची श्रीराम म्हणाले वचन। शत्रु जरी आला अनन्य शरण। करावे तयाचेही आपण रक्षण। हीच योग्य नीती असे।।३५।। सुग्रीवा रक्षण करणे शरणागतांचे। असे हेच ब्रीद हो आमुचे। समस्त हे जग निर्माण करण्याचे। असे सामर्थ्य आमुचे ठायी।।३६।। चिंता मुळी नको तुम्हाला। लक्ष्मण समर्थ आपणा रक्षिण्याला। आणावे जाऊन विभीषणाला। उचित सन्मान देऊनी तयासी।।३७।। ऐकून ऐसे श्रीरामाचे वचन। झाले मारुती अतिशय आनंदित। तुरंत बिभीषणा समीप जाऊन। सन्मान पूर्वक आले घेऊन।।३८।। विभीषणाने केला

रामास प्रणाम। म्हणाला तयांसी विनम्र वचन। असे मी राक्षस कुलोप्तन्न। बंधु असे दुष्ट दशाननाचा।।३९।। केली विनंती मी दशाननास। द्यावे सन्मानपूर्वक पाठवून सीतेस। ऐकूण रावण झाला क्रोधिष्ट। लत्ता प्रहारे झिडकारीले मजसी।।४०।। मी असे आपुला परमभक्त। आपले महानपण करुन स्मरण। माझे पुत्रांना तेथेच सोडून। आलो काही मंत्रिगणां समवेत।।४१।। असे मी आपणास अनन्य शरण। देऊनी अभय करावे रक्षण। आपण थोर करुणानिधान। कृपा करुन करावा स्वीकार।।४२।। विभीषणाचे ऐसे बोल ऐकून। उठले श्रीराम आसना वरुन। दिले त्यांनी विभीषणास आलिंगन। 'लंकेश' म्हणून बैसविले समीप।।४३।। श्रीराम म्हणाले बंधु लक्ष्मणास। मम दर्शनाचे फळ मिळावे यास। त्वरीत आणावे सिंधुजलास। गेला लक्ष्मण जल आणण्यास।।४४।। सिंधुजल घेऊन आला लक्ष्मण। बैसवून वानरां मधोमध विभीषणास। सिंधुजलाचा करुनी अभिषेक। केले अभिषिक्त लंकाराज्यपदी।।४५।। होते केले रावणे तिरस्कृत। परी मारुती कृपा होता प्राप्त। रामाने विभीषणास केला अभिषेक। झाला रामाचा आत्मीय स्वजन।।४६।। रामाने समुद्रास केली विनंती। द्यावा मार्ग लंकेस जाण्यासी। न माने समुद्र रामाची विनंती। जाहले श्रीराम कोपायमान।।४७।। म्हणे राम मी समुद्रास सुकवीन। पायी मार्ग प्राप्त करुन घेईन। काढला श्रीरामाने आपुला बाण। त्रिलोक

कापू लागला भये।।४८।। उमजली समुद्रास आपुली चूक। आला रत्नादि उपहारां सहीत। जाऊनी नम्रपणे श्रीरामा समीप। करी विनंती तो श्रीरामासी।।४९।। हे प्रभू, आपणास असे ठाऊक। सृष्टी रचना समयी केले मज जड। माझी जडमती पदरी धरुन। करावी क्षमा आपण मजसी।।५०।। असे आपुली सेना बहु विशाल। असती त्यात नल आणि नील। उभय बंधु शिल्प कलेत निपुण। असे तया ऋषींचा आशीर्वाद।।५१।। ऋषी आशीर्वादे होता त्यांचा स्पर्श। मोठे पर्वतादि ही जलावर तरतील। असती ते सेतू निर्मिण्यास समर्थ। मी ही करीन सहाय्य तयांसी। ।५२।। श्रीरामाने क्षमा केली समुद्रासी। झाली सुरु सेतू निर्मिती। हनुमानादि वानर मोठे पर्वत आणती। नलनील बांधू लागले सेतू।।५३।। अस्वल वानरादि सारे वानर। नलनीलास पर्वत वृक्ष देती आणून। सेतू जलद होऊ लागला पूर्ण। राहीली आता फक्त तेवीस योजने।।५४।। पाहुन संपले दक्षिणेतील पर्वत। मारुती घेई हिमालयाकडे झेप। आणू लागला गोवर्धन पर्वत। इकडे श्रीराम झाले सचिंत।।५५।। म्हणती गोवर्धनास असे प्रिय। माझे मुरलीधर स्वरुप। म्हणता दाखवावे तेची रुप। तेणे मजसी धर्मसंकट।।५६।। इतुक्यात वार्ता आली कानी। झाला संपूर्ण सेतू बांधूनी। दिली त्वरीत आज्ञा श्रीरामानी। हातीचे पर्वत ठायीच सोडावे।।५७।। ऐकून श्रीरामाची ही आज्ञा। मारुती वृंदावनात ठेवी गोवर्धनाला। परी मारुतीने शब्द

होता दिला। कैसा होईल तो आता पूर्ण।।५८।। आले हनुमान रामा समीप। म्हणती सांगितले मी गोवर्धनास। मिळेल तुजसी प्रभुंचे दर्शन। राहीले माझे वचन अपूर्ण।।५९।। म्हणती मारुतीस श्रीराम। सांग तया रहावे व्रजभूमीत। घेईन मी अवतार द्वापारात। दावीन तयासी मुरलीधर रुप।।६०।। इतुकेच नाही सांग तयासी। करीन मी क्रीडा त्याचे वरती। करीन धारण मम अंगुली वरती। सप्तदिन पर्यंत तयासी।।६१।। झाला आंजनेय बहु हर्षित। सांगितली गोवर्धनास ही मात। ऐकून प्रभुरामाचे शब्दांस। झाला तोही मनी संतुष्ट।।६२।। आले श्रीराम सकल सेनेसहीत। जाहले दाखल सर्वांसह लंकेत। पाठविले श्रीरामे युवराज अंगदास। दशाननाचे दरबारात।।६३।। दशानन झाला होता उन्मत्त। न मानिली तयाने श्रीरामाची मात। झाली मग युध्दाची सुरुवात। भीडले सैन्य परस्परांसी।।६४।। होते विभीषण, अंगद, नल, नील। द्विविद, गज, गवाक्ष, गवय। सुषेण, ऋषभ, दुर्मुख, जांबुवंत। होते लाखो अस्वल, वानर।।६५।। होऊ लागला राक्षसांचा संहार। अस्वल वानर करती प्रहार। होता मारुती सर्वांसमवेत। करीतसे युध्द तो सर्वत्र धाऊन।।६६।। धूम्राक्ष, अवनि, अकम्पन, अतिकाय। देवान्तक, त्रिशिकादि प्रमुख राक्षस। हनुमंताने ठार मारीले सर्वांस। ऐकून रावण झाला क्रुध्द।।६७।। निघाला मेघनाद मग युध्दास। आला ससैन्य तो रणांगणात। परी हनुमंताचे भय असे मनात। त्याच्या

पासून तो दूर राहीला।।६८।। मेघनादे केले युध्द घनघोर। केला अस्वल वानरसेनेचा संहार। करीतसे तो भयंकर बाणवर्षाव। अस्वल वानरादि झाले जखमी।।६९।। सुग्रीव, अंगद, नील, शरभ। गन्धमादन, जांबुवंत, सुषेण, मैद। नल, ज्योतिर्मुख आणि द्विविध। झाले सर्व युध्दात घायाळ।।७०।। मेघनादाने केला नागास्त्राचा प्रयोग। झाले मूर्च्छित रामलक्ष्मण। पाहुनी सैन्याची ऐसी दाणदाण। झाले विभीषण बहु चिन्तीत।।७१।। आले विभीषण जांबुवंताकडे। पाहुनी दुरवस्था दुःखी झाले। फिरवूनी प्रेमळकर कुशल पूसीले। जांबुवंत म्हणे झालो असे शरबध्द।।७२।। आवाजावरुनी ओळखले तुम्हास। सांगावे आता तुम्हीच मज। असे का आंजनेय आता जीवित। असे चिंता माझ्या मनासी।।७३।। म्हणती विभीषण जांबवतास। न पूसशी तू सुग्रीव अंगदाचे कुशल। न विचारीती तू श्रीराम समाचार। न विचारीसी तू लक्ष्मण वार्ता।।७४।। काय बरे असे याचे कारण। असे या सर्वांपेक्षाही तुज। असे का हनुमान अधिक प्रिय। न समजे तुझ्या मनीचा हेतू।।७५।। जांबुवंत मग म्हणाले तयास। जर असेल हनुमान जीवित। समज असे समस्त सेना जीवित। नाहीतर जीविताची नसे आशा।।७६।। ऐकून जांबुवंताचे ऐसे वचन। झाला विभीषण आश्चर्य चकित। करु लागला तो विचार मनात। जांबुवंत करी मारुतीचे स्मरण।।७७।। आला धाऊन पवनात्मज तेथ। केला त्याने जांबुवंताचा चरणस्पर्श। झाली

जांबुवंतास शक्ती प्राप्त। झाले सर्व पुनः उत्साहीत।।७८।। आला कुम्भकर्ण युध्दास। झाले अस्वल वानर भयभीत। मारुतीने मारला ठोसा त्यास। व्याकुळ होऊनी तो भूवर पडला।।७९।। उठुनी फिरुनी करीतसे तो युध्द। कुम्भकर्ण रामात सुरु झाले द्वंद्व। एका दिवसाच्याच कालावधीत। श्रीरामबाणे झाला कुम्भकर्ण मुक्त।।८०।। आता विशालकाय दशानन। झाला दाखल युध्द भूमीत। घेवून तेजस्वी धनूष्य हातात। करु लागला बाणांचा वर्षाव।।८१।। त्याच्या बाणांचा मारा पाहून। झाली वानरसेना विचलीत। आला मग पवनात्मज तेथ। दाखविली त्याने रावणास वज्रमूठ।।८२।। केला रावणाने मुष्टी प्रहार। झाला मारुती क्षणात सुस्थिर। केला मुष्टीप्रहार रावणावर। झाला रावण विचलीत।।८३।। रावण करीतसे बाण वर्षाव। होऊ लागले धराशायी वानर। पाहुनी आक्रमण करती रघुवीर। मारुतीने सांगितले तयांस।।८४।। विष्णु लढती गरुडावर बैसोन। आपण माझे पाठीवर बैसोन। करावे युध्द मी होईन वाहन। चिंता आपण करु नये।।८५।। झाले मेघनाद लक्ष्मण युध्द। मेघनादाने अस्त्रशस्त्राचा प्रहार। केला तेव्हा सुमित्रा नंदनावर। व्यर्थ होती सारी शस्त्रास्त्रे।।८६।। झाला मेघानाद बहु चिन्तित। लक्ष्मणावर त्याने सोडीली मग। अमोघ शक्ती जी ब्रह्मदत्त। झाली ती प्रविष्ट लक्ष्मण हृदयी।।८७।। उडाली रक्तधारा आसमंतात। पडला सौमित्र भूवरी बेशुध्द। धावला मेघनाद उचलण्या त्यास।

शक्य न झाले तयासी।।८८।। मिळाली सूचना हनुमन्तास। आला धाऊन तो लक्ष्मणाप्रत। उचलोनी तयासी धरीले हातात। आला घेऊन तो श्रीरामाकडे।।८९।। पाहुनी श्रीराम झाले चिन्तित। झाली होती अमोघ शक्ती प्रविष्ट। हनुमान म्हणती रघुनंदनास। आणीन अमृत मी त्रिलोकातून।।९०।। विभीषण संकेते म्हणाले जांबुवंत। करावे आपण एक मोठे कार्य। जाऊनी लंकानगरीत आपण। सुषेण नाम चिकित्सकास आणावे।।९१।। विभीषणे पत्ता सांगितला त्यास। गेला हनुमंत मग लंकानगरीत। समयावधी होता बहु अल्प। त्याने सुषेणाचे भवनच आणीले।।९२।। बाहेर येवोनी सुषेण पाहती। श्रीरामाची सेना तेथे होती। विभीषणाने सांगितले तयासी। सुषेणाने केली नाडी परीक्षा।।९३।। म्हणाले जखमेचे घाव गंभीर। जर मिळेल संजीवनी सूर्योदयापूर्वी। तरीच यास लाभेल शक्ती पूर्ववत। अन्यकाही उपाय नसे यासी।।९४।। सुषेण तेंव्हा मारुतीकडे पाहती। लंका दहनामुळे तयाची शक्ती। सुषेणास सुपरिचित होती। जाणत होते मारुती सामर्थ्य।।९५।। सुषेण म्हणाले हनुमंतासी। समर्थ आपणची या कार्यासी। जावे त्वरीत हिमालय नगापाशी। असे सुदूर ते स्थान येथून।।९६।। जाता तुम्ही हिमालया पाशी। दिसतील सुवर्णमय पर्वत तुम्हासी। ऋषभ आणि कैलास नामे त्यांची। त्यांच्या मध्यभागी द्रोण पर्वत असे।।९७।। असे द्रोणपर्वत औषधी संपन्न। तेज त्याचे असे असामान्य।

मिळती तेथे सर्व औषधी सहज। जावे आपण द्रोणपर्वतावर।।९८।। असती तेथे संजीवनी विशल्यकरणी। सुवर्णकरणी आणि संधानी। असती प्रकाशमान या औषधी। आणव्या आपण तेथे जाऊनी।।९९।। आणुनी त्या औषधी त्वरीत। द्यावे प्राणदान सौमित्रास। परी उपयोगी त्या सूर्योदयापर्यंत। नंतर अशक्य लक्ष्मणास वाचविणे।।१००।। 'जय श्रीराम' करुनी गर्जना। वायुवेगाने मारुती उडाला। पवनात्मज पवनासम निघाला। औषधी संपन्न द्रोणपर्वताकडे।।१०१।।

श्री व्यंकटेशचरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

## ।।राजवशीकरणाध्याय।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री हनुम नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

श्रीराम स्वतः पुरुषोत्तम। केला अवतार मानव म्हणून। करीती सर्व मर्यादांचे पालन। असती लीला अगाध त्यांच्या।।१।। तयांचे चरणी करीतो वंदन। करती तेच सकलांचे रक्षण। मजहस्ते घेती करवून लेखन। सामर्थ्य प्रेरणा असे तयांची।।२।। आता वर्णावी हनुमंताची लीला। असे हा सामर्थ्यवान रुद्र भोळा। शब्द अपूर्ण पराक्रम वर्णिण्याला। असे हनुमंत बहु प्रतापी।।३।। निघाला हनुमान वायुवेगे। हिमालयकुशीत तेंव्हा त्याने। अतिशय सुंदर तपोवन पाहीले। होते एक तेजस्वी मुनी तेथे।।४।। लागली हनुमंतास तेंव्हा तृषा। पाणी पिण्यास तपोवनात उतरला। जाऊनी नमिले मुनिचरणाला। म्हणे मी श्रीरामभक्त हनुमान।।५।। निघालो असे मी स्वामीकार्यासी। परी मार्गी तृषार्त झालो म्हणुनी। उतरलो पाणी पिण्यास्तव खाली। कृपया जलाचे ठिकाण सांगावे।।६।। मुनी म्हणाले मग मारुतीसी। माझ्या या कमंडलुतील जलासी। पिऊन क्षमवावे आपण तृषेसी। तेंव्हा हनुमंत म्हणाला त्यांसी।।७।।

माझी तृषा असे बहु महान। पाहीजे मज विस्तृत जलसरोवर। मग मुनींनी सांगितले त्यास। असे समीप एक जलाशय।।८।। परी प्राशुनी तेथील नीर। यावे तू माझ्या समीप। औषधी शोधणे असे कठीण। सांगेन मंत्र मी तुजसी।।९।। पाणी पिताना करावे नेत्र बंद। तैसेची केले मारुतीने जाऊन। विशाल मगरीने पकडला चरण। उघडले मारुतीने नयन।।१०।। पाहीली त्याने भयंकर मगर। गिळू पहात होती त्यास। क्रोधे त्याने फाडीले तिचे मुख। मगर तात्काळ मरण पावली।।११।। एक स्त्री दिसली मारुतीस आकाशी। म्हणे ती मी अप्सरा धान्यमाली। झाले मुक्त मी तुझ्यास्पर्शी। आत मी सांगते ते ऐकावे।।१२।। हा येथील आश्रम आणि तपोवन। मुनी आणि सारेच असे कृत्रिम। मुनी म्हणजे कालनेमी राक्षस। तुज विलम्ब घडविण्यास आला येथे।।१३।। कालनेमी राक्षसास ठार करुन। द्रोणाचलावर तू जावे त्वरीत्त। जाईन मीही आता ब्रह्मलोक। जाहली अदृश्य ती अप्सरा।।१४।। आला मग हनुमान त्वरीत। केले मुनीस पुच्छेत बंदीस्त। आपटून मोठया खडकावर त्यास। क्षणार्धातच केले ठार।।१५।। घेऊन मुखाने श्रीरामनाम। आला द्रोणागिरीवर हनुमान। पाहीली तेथे औषधी अनेक। उचलला त्याने द्रोणपर्वत।।१६।। घेऊन द्रोणागिरीस हस्ती। उडाला मारुती वेगे आकाशी। आला जेंव्हा तो अयोध्येपाशी। भरताने हळूच सोडला बाण।।१७।। झाला हनुमान मग मूर्च्छित।

पडला द्रोणपर्वतासह भूमीवर। होते त्याच्या मुखी श्रीरामनाम। ऐकून खिन्न झाला भरत।।१८।। केला तयाने श्रीरामास प्रणाम। केले श्रीरामस नम्र निवेदन। व्हावे सशक्त फिरुन हनुमान। ऐसे वरदान मागितले भरताने।।१९।। आले शुध्दीत मारुती क्षणात। 'मी कोठे' असे विचारिले भरतास। 'अयोध्या नगरीत' वदे भरत। ऐकून हनुमान प्रसन्न झाला।।२०।। मग हनुमान म्हणाले भरतास। आपणच असा रामभक्त भरत। तुमचेच नाम असे स्वामी मुखात। पाहुनी आपणा धन्य झालो मी।।२१।। मग हनुमंताने सांगितले त्यास। रामदूत मी अंजनासुत। संपूर्ण वार्ता करुनी कथन। म्हणे मज असे जाणे त्वरीत।।२२।। मेघनादाच्या शक्तीने लक्ष्मण। झाला असे तो बेशुध्द। त्याचे साठी संजीवनी नेण्यास। द्रोणागिरी घेऊन असे निघालो।।२३।। घेऊन तेथील सर्वांचा निरोप। इकडे होते श्रीराम चिंतीत। आला हनुमान तेथे त्वरीत। द्रोणागिरीस ठेवीले भूवर।।२४।। सुषेणाने मग घेऊनी औषधी। लक्ष्मणाच्या नाकास लाविली। लक्ष्मणास त्वरीत शुध्द आली। उठूनी लगेच तो बैसला।।२५।। सौमित्रास झाला पूर्ण आराम। मग श्रीरामास म्हणे सुषेण। द्यावे मज लंकेस पाठवून। रामाज्ञेने हनुमंत निघाला।।२६।। सूर्योदयापूर्वी लंकेत ठेवून त्यास। तैसाची घेऊन गेला द्रोणपर्वत। स्थापून पर्वत परत पूर्ववत। सूर्योदयापूर्वी आला हनुमान।।२७।। चालले होते युध्द घनघोर। पडती धारातीर्थी

राक्षसवीर। लक्ष्मणाने मारीले मेघनादास। रावणास अहिरावणाची झाली आठव।।२८।। अहीरावण असे देवीभक्त। ऐसा विचार करुनी मनात। केले रावणाने देवी आराधन। अहीरावण तुरंत झाला अपस्थित।।२९।। रावणे सांगितली सर्व हकीकत। ऐकूनी अहीरावण म्हणे त्यास। केलेसी तू कार्य अनुचित। नसती रामलक्ष्मण सामान्य।।३०।। असो आज्ञा द्यावी आता। काय करावे मी ते सांगा। रावण म्हणे सानुज श्रीरामा। घेऊनी जावे तव पुरीत।।३१।। करावा तू वध त्या दोघांचा। ऐकूनी पळेल श्रीरामसेना। असशी समर्थ तू माझे रक्षणा। इतुकीच असे माझी विनंती।।३२।। म्हणे अहीरावण करीन कार्य। देखता आकाशी आपण प्रकाश। समजावे मी केले कार्य पूर्ण। ऐसे म्हणून अहीरावण निघाला।।३३।। होता तेंव्हा निशासमय। करीत होती सर्व सेना शयन। देत होता पहारा अंजनेय। झाला अहीरावण चिन्तीत।।३४।। विभीषण वेष करुन धारण। जाऊ लागला तो श्रीराम सेनेत। विचारी तयासी आंजनेय। म्हणे संध्यावंदन करता झाला उशीर।।३५।। पाहीले तयाने श्रीरामलक्ष्मण। मध्यभागी करीत होते विश्राम। केली त्याने सर्व सेना मोहीत। निघाला घेऊन सानुज श्रीरामास।।३६।। पाहुनी आकाशी तेजप्रकाश। झाला दशानन बहु हर्षित। इकडे जागा झाला सुग्रीव। रामलक्ष्मण नव्हते सेनेत।।३७।। भीतीने सुग्रीवाने केला चित्त्कार। झाली जागृत सेना समस्त। मारुतीस विचारीतसे

जांबुवंत। रात्री समयी कोण आले होते।।३८।। म्हणे मारुती कोणी नसे आले। परी विभीषण रात्री उशीरा आले। ऐकूनी विभीषणाने त्यास म्हणाले। मी तर कोठेच गेलो नाही।।३९।। मग विभीषणाने ओळखले। हे दुष्टकृत्य अहिरावणाने केले। ऐसा माझा वेष धारण करणे। असे अशक्य अन्य राक्षसांसी।।४०।। असे पाताळी अहीरावणाचे राज्य। सांगितला विभीषणाने मारुतीस मार्ग। वेगे पाताळाकडे निघाला हनुमान। त्वरीत पाताळी जाऊन पोहोचला।।४१।। हनुमंतास एक वानरे अडविले। म्हणे मी मारुतीसुत मकरध्वज असे। हनुमंताने तेंव्हा त्यास सांगितले। असे हनुमंत बालब्रह्मचारी।।४२।। मकरध्वज म्हणाला मारुतीसी। लंकादहना नंतर मग मारुती। विझवून आग ते स्नान करीती। त्यांचा स्वेद मासळीने गिळीला।।४३।। तेणे झाली मासोळी गर्भवती। आणीले पकडून भोजनगृही तिजसी। तिच्या पोटी झाली माझी उत्पत्ती। अहीरावणाने माझे पालन केले।।४४।। मारुतीने विचारीता मकरध्वजासी। म्हणे अहीरावणाने आणले दोघांसी। देणार असे त्यांचा बळी देवीसी। अहीरावण करीतसे पूजा विधान।।४५।। मग मारुनी ठोसा मकरध्वजासी। आला देवीपाशी मारुती। त्याचे स्पर्शे देवी पाताळी प्रवेशली। हनुमान देवीस्थानी उभा राहीला।।४६।। सुरु झाले पूजाविधान। भयंकर गर्जना करी हनुमान। घेऊनी अहीरावणाची तलवार। केले त्याचे मस्तक

धडावेगळे।।४७।। मारुनी ऐसे अहीरावणास। मकरध्वजास पाताळराज्य देऊन। आले तिघेही सेनेत परत। युध्द पुन्हा सुरु झाले।।४८।। झाले अतिशय घनघोर युध्द। भिडीले परस्परा रामरावण। श्रीरामाने केला रावणाचा वध। झाली विजयी श्रीरामाची सेना।।४९।। झाला मोठा विजयोत्सव। स्थापिले विभीषणास राज्यपदावर। निघाले श्रीराम जानकीसह। निघाला विभीषण तयांसमवेत।।५०।। झाले समस्त पुष्पक विमानारुढ। आले विमान गन्धमादन पर्वतावर। केली सीतेची अग्निपरीक्षा तेथ। सर्व ऋषीमुनी देती आशीर्वाद।।५१।। करुनी मुनींसी विनित प्रणाम। तयांसी म्हणती मर्यादा पुरुषोत्तम। असे मी एक क्षत्रिय कुलोत्पन्न। दुष्टांसी शासन करणे असे धर्म।।५२।। याच कारणे असे केला संहार। लंकाधिपतीचा पुत्रपौत्रसह। परी रावण असे द्विजकुलोत्पन्न। झाला मम हस्ते ब्राह्मणवध।।५३।। विनम्र भावे पूसतो आपणास। असे ब्रह्महत्या पातक मज। कैसे करावे या पापाचे शमन। सांगावा उपाय आपण मजसी।।५४।। मुनी म्हणती मग श्रीरामास। नसे केले तुम्ही काही अनुचित। परी लोकसंग्रहाचा करुन विचार। करावी स्थापना शिवलिंगाची।।५५।। होईल लिंग तव नामे प्रख्यात। होईल दशानन वध दोष दूर। परी लिंग स्थापण्यासाठी सुमुहुर्त। असे केवळ दोन घटिकांपर्यंत।।५६।। पाठविले रामाने हनुमंतास। कैलासाकडे लिंग आणण्यास। झाला विलम्ब

मारुती जाण्यास। सदाशिव दर्शन न लाभे त्यास।।५७।। प्रतिक्षा करुन भेटून सदाशिवास। शिवलिंग घेऊन निघाला बजरंग। परी इकडे होत होता विलम्ब। म्हणुनी मुनीवर म्हणाले श्रीरामास।।५८।। वैदही निर्मित असे वालुका लिंग। तेची आता करावे स्थापन। मुनी आज्ञेचे करण्या पालन। वालुकालिंगाची केली स्थापना।।५९।। झाले सदाशिव परमसंतुष्ट। सतीसह लिंगातून झाले प्रकट। म्हणती करीता हे शिवलिंगदर्शन। सकलांचे पाप नष्ट होईल समूळ।।६०।। झाले सदाशिव मग अंतर्धान। आला शिवलिंग घेऊन हनुमंत। श्रीराम करती शिवलिंग पूजन। पाहून मारुती झाला खिन्न।।६१।। म्हणाला हनुमान श्रीरामास। आपण पाठविले मज कैलासास। आलो वायुवेगे शिवलिंग घेऊन। ह्या शिवलिंगाचे काय करावे।।६२।। श्रीराम म्हणती पवनसुतास। मुहुर्ताकारणे स्थापिले हे शिवलिंग। तुजसी असे निश्चित ठाऊक। तुझे प्रत्येक कार्य माझेची असे।।६३।। म्हणुनी हे वानरश्रेष्ठा ऐकावे। कैलासीचे हे शिवलिंग स्थापन करावे। होईल ख्यात 'हनुमदीश्वर' नामे। होईल हे प्रसिध्द त्रिलोकात।।६४।। घेऊनी हनुमदीश्वराचे दर्शन। मगच घेतील रामेश्वराचे दर्शन। या शिवलिंगाची स्थापना करुन। होशील तू ही पापातून मुक्त।।६५।। श्रीराम प्रेरणेने मग पुष्पक विमान। जाऊ लागले किष्किन्धा नगरीवरुन। उतरविले श्रीरामे विमान किष्किन्धेत। आल्या तारादि सीता

भेटीस।।६६।। तेव्हा मारुती म्हणाले श्रीरामास। करु इच्छितो मातेचे चरणदर्शन। आले विमान कांचनगिरीवर। निघाले सर्व अंजनादर्शनास।।६७।। हनुमाने अंजनेसी पाहता दुरुन। धाऊन पकडीले त्याने मातेचे चरण। दिला मातेस हनुमानाने श्रीरामसह। सीतालक्ष्मणादिंचा परीचय।।६८।। श्रीराम, सीता आणि लक्ष्मण। केला त्यांनी अंजनीस प्रणाम। समस्त अस्वल वानरगण। करती तियेसी विनम्र वंदन।।६९।। हनुमंताने केले स्वपराक्रम वर्णन। ऐकून माता झाली कोपायमान। म्हणे सर्वथा अयोग्य तुझे वर्तन। झाले व्यर्थ की माझे दूध।।७०।। हनुमान म्हणाला हात जोडून। केले मी केवळ प्रभु आज्ञेचे पालन। न घडले कधीही ऐसे वर्तन। जेणे व्यर्थ होईल तुझे दूध।।७१।। ऐकून सर्व झाले आश्चर्यचकित। मग अंजना वदली तयांस। म्हणे मी पाजीले दूध जयास। त्याने आपणास का श्रमविले।।७२।। ऐकून लक्ष्मणास वाटे आश्चर्य। पाहुनी अंजनी म्हणाली त्यास। माझे दूध असे असाधारण। पहावा त्याचा प्रभाव प्रत्यक्ष।।७३।। सोडीली तिने आपल्या दुधाची धार। जवळच्याच एका पर्वतशिखरावर। कडकड करीत ढासळले ते शिखर। करती सर्व अजंनीचा जयजयकार।।७४।। मग आज्ञा घेऊन अंजनीची। पुष्पक आकाशी उड्डाण करुनी। आले तीर्थराज प्रयागक्षेत्री। उतरले सर्व तीर्थ पूजेसाठी।।७५।। श्रीरामासे मारुती भेटे निषादराजस। ऐकूनी ते झाले आनंदीत। मग मारुतीने

भरतास दिला संदेश। ऐकूनी भरत झाला भवविभोर।।७६।। वायुवेगे पसरली आनंदवार्ता। आनंदोल्हसीत झाल्या माता। मोहरली आनंदे नगरी अयोध्या। आनंदी आनंद पसरला सर्वत्र।।७७।। सजले राजगृह सजली सदने। लागली रत्नमोत्यांची तोरणे। वस्त्राभरणांनी आबालवृध्द सजले। निघाला जनसागर दर्शनासी।।७८।। भरत, शत्रुघ्न, महर्षि वसिष्ठ। माता, राजमहिला समस्त। करती प्रतिक्षा होऊनी आतुर। आले इतुक्यात विमान पुष्पक।।७९।। झाला एकची हर्ष जल्लोष। उठला जयकार आसमंतात। श्रीराम, सीता, लक्ष्मणासमवेत। उतरले भूवर षुष्पक विमानातून।।८०।। पाठविले परत मग श्रीरामाने। पुष्पक विमान कुबेराकडे। पायउतार होऊन सर्व आले। झाले सर्व आनंदोल्हसित।।८१।। पाहुनी वसिष्ठादि मुनी सम्मुख। श्रीरामे केले तयांसी वंदन। सर्वांसी करुनी विनम्र प्रणाम। मिळविले त्यांचे शुभाशिर्वाद।।८२।। ठेऊनी पादुका श्रीरामा समोर। भरताने पकडले श्रीरामचरण। पाहुनी भरताचे बंधुप्रेम। वाहती अश्रुधारा नेत्रांतून।।८३।। अश्रुंनी घातले चरणस्नान। परी सोडीना भरत रामचरण। मग श्रीरामे तयासी प्रेमे उठवून। दिधले घट्ट प्रेमालिंगन।।८४।। श्रीराम - भरताची ही अपूर्व भेट। झाला सद्‌गदीत जनसमुदाय। वाहती अश्रु नयनांतून। पाहुनी अपूर्व आनंद सोहळा।।८५।। सुरु होता सर्वत्र जल्लोष। जनानंदाने पुलकीत आसमंत। सिंहासनारुढ झाले श्रीराम।

जाहली अयोध्यनगरी कृतार्थ।।८६।। भरला श्रीरामाचा राज दरबार। देती श्रीराम सर्वांसी स्नेहभेट। अलंकार रत्नादिंची केली लयलूट। सुग्रीव, नलनीलादि झाले हर्षित।।८७।। सीतेस दिली वस्त्रभूषणे। कंठी रत्नहार घातला श्रीरामाने। वायुदेवाने दिलेला तो रत्नहार। चंद्र किरणांसम प्रकाश तयाचा।।८८।। लाभला प्रत्येकास उपहार। मारुतीस न मिळाले उपहार। सीता करी मनी विचार। होता कण्ठी मूल्यवान रत्नहार।।८९।। जाणुनी तिचे मन रघुपती। तात्काळ वदले ते तियेसी। द्या हार तुम्हा पाहीजे त्यासी। सीतेने दिला तो मारुतीसी।।९०।। वाटले होते होईल तो मुदीत। परी निरखुनी पाही तो रत्नहार।फोडीले रत्न ठेवून दातात। परी काहीही न मिळे त्यास।।९१।। दिले ते रत्न मारुतीने फेकून। ऐसे तो चावू लागला एकेक रत्न। कारण पुसता वदे हनुमान। या रत्नात नसती श्रीराम।।९२।। तयासी पूसती विभीषण। 'असती का श्रीराम तुझे देहात'। 'नक्कीच असती' वदे बजरंग। नाही तर नष्ट करीन देह।।९३।। मारुतीने वक्षावर ठेवून हस्त। नखाने फाडीले तयाने वक्ष। पाहुनी तेथे सीतेसह श्रीराम। जाहले समस्त आश्चर्यचकित।।९४।। सीतेने मग उठूनी तात्काळ। लाविला तयाचे माथी सिंदुर। माथी लागला सीतेचा सिंदुर। जाहले हनुमान बहु हर्षित।।९५।। पूसती सिंदुर माथी लावण्याचे कारण। तेणे होते स्वामी आयुष्यमान। मग मनी विचार करी हनुमान। मी लावीन सिंदूर

पूर्ण देहास।।९६।। गेला तिथून निघून पवनात्मज। आला सर्वांगी तेले सिंदूर लिंपून। हसू लागले समस्त सभाजन। श्रीराम पूसती तयासी कारण।।९७।। म्हणे माता कपाळी लावे सिंदूर। तेणे होते तुमचे आयु वर्धमान। तुम्हास दीर्घायुष्य लाभावे म्हणून। लाविला सिंदूर मी सर्वांगासी।।९८।। म्हणाले रघुवीर हनुमंतास। असे आज शुभ मंगळवार। मंगळवारी जो तुज अर्पिल तेल सिंदूर। होतील तयाच्या मनोकामनापूर्ण।।९९।। हर्षोल्हासित जाहला बजरंग। श्रीरामवरदाने झाला प्रसन्न। मंगळवारी अर्पिती तेल अन् सिंदूर। समस्त भक्त तेंव्हा पासून।।१००।। ऐसी भक्ती निर्मोही निष्काम। करीता होती श्रीराम प्रसन्न। भक्त असावा जैसा हनुमान। लाभावी भक्ती हनुमानासम।।१०१।।

श्रीमारुतीदेवता चरणार्पणमस्तु। श्री स्वामीसमर्थ चरणार्पणमस्तु।

ॐ नमो आदेश गुरु को। राजा मोहु प्रजा मोहु, मोहु ब्राह्मण वनियां।
हनुमंतरूप में जगत मोहु तो रामचंद्रपर मानिया।
गुरु की शक्ति मेरी भक्ति, फुरो मंत्र ईश्वरी वाचा।

## ।।रोगनिवरक सर्व ऊपद्रवशांती अध्याय।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री व्यंकटेशाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

घेता मुखी श्रीरामनाम। होई सप्तजन्म पापशमन। होता रघुवीर रामचंद्र प्रसन्न। जीवनहोई कृतार्थ धन्य।।१।। वंदन करीता श्रीराम चरणी। दाटे आनंद मारुतीचे मनी। श्रीरामभक्त मारुती चरणी। असे माझे विनम्र वंदन।।२।। करावे श्रीमारुती चरीत्र कथन। सांगावे श्रीराम प्रेम सर्वां लागून। वर्णावा श्रीमारुती पराक्रम। त्यासाठी द्यावी त्यानेच मती।।३।। श्रीरामासमोर बसे मारुती। न्याहाळी सीताराम मुखासी। असे सदैव हर्षित मानसी। सेवा कार्यात अति तत्पर असे।।४।। सुग्रीव विभीषण गेले निघोन। म्हणती ते हनुमन्ता लागोन। तू आता येथेची सदैव राहून। करावी श्रीरामसेवा निरंतर।।५।। सांगती सकलजन मनोरथ तयासी। करी निवेदन तो श्रीरामासी। श्रीराम पूर्ण संतोष मानसी। करीती पूर्ण मनोरथ त्यांचे।।६।। होता मारुती रामप्रीती भाजन। भरतादि बान्धवांसही प्रिय। कौसल्यादि माता त्यावरी प्रसन्न। सीता कौतुके पुत्र मानी त्यास।।७।। श्रीराम सेवा तत्पर मारुती। असे प्रभुकार्य

प्रीती तयासी। तेणे भरतादि वंचित राहती। न लाभे श्रीरामसेवा त्यांसी।।८।। गेले ते सर्व जानकीप्रति। म्हणे आम्हा रामसेवा प्रीती। परी सर्व सेवातत्पर मारुती। न लाभे संधीच आम्हासी।।९।। केले त्यांनी सेवांचे कोष्टक। टाकीली स्वत:ची नामे त्यावर। मिळवूनी रामहस्ताक्षर त्यावर। लाविली राजमुद्राही त्यावर।।१०।। दुसरे दिनी ते मारुतीस सांगती। केली असे प्रभुकार्य करण्यास नियुक्ती। आपापुले कार्य करील तोची। ऐकून मारुती झाला चकीत।।११।। पाहीले तयाने संपूर्ण कोष्टक। नसे मारुतीचे नाम तयात। म्हणे आता कोणते कार्य शिल्लक। आले लक्षात तेंव्हा तयासी।।१२।। येता जांभई श्रीराम वाजविती। आपुल्या हस्ते ते चुटकी। हे कार्य मी करीन निश्चिती। घेतले त्यावर श्रीराम हस्ताक्षर।।१३।। दिवसभर केले मारुतीने काम। परी रात्री समयाचा आला प्रश्न। म्हणे स्वामीस रात्री जांभई येईल। म्हणून गच्चीवर बसून चुटकी वाजवी।।१४।। मारुती चुटकी वाजवी सतत। रामास जांभई येई सतत। त्याने श्रीराम झाले अतित्रस्त। मुख त्यांचे मिटेचिना।।१५।। आले सर्व धाऊन श्रीरामाकडे। पाहुनी चिंतीत झाले सारे। वैद्यराजांनी सारे उपाय केले। परी आराम काही वाटेना।।१६।। आले वसिष्ठमुनी हे ऐकून। तेथे हनुमान नाही हे पाहून। सीतेकडून सर्व हकीकत ऐकून। शोध घेती ते हनुमानाचा।।१७।। हनुमान करीत होता नामस्मरण। उजव्या हाती चुटकी

सतत। वसिष्ठ आले तेथे धाऊन। केला हनुमंताने त्यांना प्रणाम।।१८।। आले मारुतीस रामाकडे घेऊन। श्रीरामाची तशी अवस्था पाहून। झाला मारुती अतिशय व्याकुळ। पडली बंद चुटकी तयाची।।१९।। चुटकी बंद होता क्षणीच। झाले श्रीरामाचे मुख बंद। वाटला तयांसी शीघ्र आराम। मारुती धरी चरण रामाचे।।२०।। मग जानकी वदे मारुतीसी। करावी तूच सर्व सेवा रामाची। कोणी न बाधा करील तुजसी। मारुती सीताचरणी लागला।।२१।। आता ऐसीच कथा ऐकावी। होता हनुमान श्रीरामनाम प्रेमी। रामनाम जप कर्त्याच्या रक्षणासी। असे सदैव सिध्द मारुती।।२२।। एके दिवशी मारुतीने केली। विनंती प्रभुरामचंद्राच्या चरणी। मातृदर्शनार्थ जाण्यासाठी। मागितली आज्ञा श्रीरामाची।।२३।। दिली आज्ञा प्रभुरामचंद्रांनी। काशीराज येत होते रामदर्शनासी। मार्गी त्यांना भेटले नारदऋषी। काशी नरेशाने केला प्रणाम।।२४।। नारदाने विचारीले तयासी। कार्य एक कराल का मजसाठी। काशीनरेश वदले नारदासी। आपली आज्ञा न मानेल कोणी।।२५।। नारद म्हणाले काशीराजासी। निघाला असा प्रभुराम दरबारासी। करावा विनम्र प्रणाम श्रीरामासी। विश्वामित्रांसी न करावे वंदन।।२६।। करावी विश्वामित्राची उपेक्षा। काशीराजास न उमगे अर्थ याचा। नारद म्हणे कळेल परिणाम याचा। तुजसी नंतर आपोआप।।२७।। आला काशीनरेश प्रभुरामापाशी। विनम्र

भावे वंदिले चरणासी। परी न केले वंदन विश्वामित्रासी। केली विश्वामित्रांची उपेक्षा।।२८।। झाले विश्वामित्र अति संतप्त। म्हणाले नंतर ते श्रीरामास। म्हणविसी मर्यादा पुरुषोत्तम। न व्हावी उपेक्षा तुजसमोर कोणाची।।२९।। न उमगला अर्थ श्रीरामासी। विश्वामित्र मग म्हणाले त्यासी। काशीराजाने वंदन केले तुजसी। परी माझी उपेक्षा केली त्याने।।३०।। ऐकून रामास आला क्रोध। केले काशिराजाने अनुचित कार्य। काढूनी मग भात्यातून तिन बाण। म्हणे मारीन ठार आजच त्यासी।।३१।। काशीराजाने ऐकिली प्रतिज्ञा। झाला भयभीत मग काशीराजा। नारदासमीप तो धाऊन गेला। म्हणे श्रीराम मज मारतील ठार।।३२।। म्हणती नारद मज असे ज्ञात। श्रीराम हस्ते मरता मिळेल मोक्ष। मी सांगतो ते ऐक नीट। जाऊनी धरी अंजनीचे चरण।।३३।। करावे तू मोठयामोठयाने रुदन। अजिबात न सोडी तिचे चरण। घ्यावे तिजकडून रक्षणाचे वचन। त्रिवार वचन घ्यावे तिजकडून।।३४।। आला काशीराज अंजनेपासी। घातला साष्टांग नमस्कार तिजसी। रडत म्हणाले रक्षावे मजसी। तिचे पाय धरुन करी रुदन।।३५।। विचारिता कारण सांगे तियेसी। एका समर्थे केले प्रतिज्ञेसी। सायंपर्यंत ठार मारणार मजसी। करावे आपण माझे रक्षण।।३६।। विचारी अंजना कोण हा समर्थ। ऐसी प्रतिज्ञा करणार कोण। राजा म्हणे द्यावे रक्षा वचन। नाही तर करीन इथेच प्राण त्याग।।३७।। दिले अंजनेने त्रिवार

अभिवचन। मग सोडले राजाने चरण। उठविले अंजनेने मग तयास। सांग आता कोण हा समर्थ।।३८।। काशिराजाने सांगितले तिज। केला श्रीरामाने ऐसा पण। ऐकून अंजना झाली चिंतीत। न होणार असत्य श्रीराम वचन।।३९।। तितुक्यात तेथे आला हनुमान। केले तयाने मातेस वंदन। अंजना म्हणाली त्यास मग। आला असशी तू योग्य समयी।।४०।। करीत होते मी तुझेच स्मरण। वाटे आता होईल कार्य पूर्ण। माते तुझी आज्ञा सर्वथा प्रमाण। कार्य काय सांगावे मजसी।।४१।। म्हणे अंजना कार्य असे कठीण। सांगावे कि न सांगावे वाटे म्हणून। झाले असे साशंक माझे मन । काळजीने कातर झाले मी।।४२।। मग सत्वर म्हणाला हनुमान। माते तुझी आज्ञा करीन पूर्ण। देतो तुजसी त्रिवार अभिवचन। सांगावे कोणते असे कार्य मजसी।।४३।। म्हणे काशीराजास दिले रक्षावचन। श्रीरामाने केला असे पण। सायंपर्यंत त्याचा वध करीन। ठेवले तीन बाण काढून त्यास्तव।।४४।। झाला मारुती गंभीर ऐकून। म्हणे माझ्या प्रभुंचा हा पण। अंजना म्हणे मी दिले असे वचन। काय करावे सांग मजसी।।४५।। झाला हनुमंत चिंताग्रस्त। म्हणे करीन मीही प्रयत्न। मजकडे असे समय बहु अल्प। म्हणुनी द्यावी मजसी आज्ञा।।४६।। मग काशीराजास सवे घेऊन। आला अयोध्येस हनुमान। राजास शरयु जली उभा करुन। सांगितले करावा रामनाम जप।।४७।। निघाला त्यानंतर मग हनुमान। रामासमीप

जाऊनी धरीले चरण। म्हणे स्वामी द्यावे एक वरदान। श्रीराम म्हणे मी देतो वचन।।४८।। मग मारुती म्हणाला श्रीरामास। माझ्या मनी असे इच्छा एक। जो कुणी करील श्रीरामनाम जप। करावे सदैव मी त्याचे रक्षण।।४९।। तैसेची मी असता उपस्थित। कुणीही न करावा त्याजवर प्रहार। सृष्टीच्या स्वामीने ही करता प्रहार। व्हावा व्यर्थ त्याचाही प्रहार।।५०।। श्रीरामाने दिधले वचन तयास। होईल समर्थ प्रहारही व्यर्थ। करशील तू जपकर्त्याचे रक्षण। असे वरदान मी देतो तुजसी।।५१।। करुन प्रभुरामास प्रणाम। आला शरयुतटी हनुमान। राजास म्हणे करी रामानाम जप। स्वतः रक्षणास सिध्द राहीला।।५२।। होऊ लागला संध्यासमय। झाले क्रोधित रघुवर राम। उचलुनी तीना तील एक बाण। सोडला त्याने काशीराजावर।।५३।। परंतु राजा करीत होता जप। न भेदू शकला तयास बाण। आला रामाकडे परत तो बाण। म्हणे दिलेत मारुतीस वचन।।५४।। सोडून श्रीरामाने दुसरा बाण। राजा करी जप सीताराम। झाला दुसरा बाणही व्यर्थ। झाले श्रीराम बहु कोपायमान।।५५।। निघाले शरयु तटाकडे श्रीराम। राजासह मी हनुमानास वधीन। ऐकून विचार करी हनुमान। असती श्रीराम भक्तवत्सल।।५६।। आता सांगितले काशिराजास। जय सीताराम जय हनुमान। करीत रहा ऐसा निरंतर जप। राजाची शक्ती झाली क्षीण।।५७।। मग अंशरुपे तयाच्या कंठात। प्रवेश करुन

जप करी हनुमान। इकडे वसिष्ठ झाले चिंतीत। आले धावून ते हनुमानाकडे।।५८।। सांगु लागले ते हनुमंतास। अरे काशीराजास मिळेल मोक्ष। त्याचेसाठी प्रत्यक्ष रामासम्मुख। न रहावे उभे तू ऐसे।।५९।। परी होता हनुमान वचन बध्द। जाणती हा ज्ञानी प्रत्यक्ष। मग वसिष्ठमुनी जाऊनी परत। पाहीले त्याने श्रीरामासी।।६०।। निघाले श्रीराम शरयुतटाकडे। महर्षी विश्वामित्र होते तेथे। मग वसिष्ठमुनी राजास म्हणाले। जाऊनी पकडावे विश्वामित्र चरण।।६१।। राजाने पकडले विश्वामित्र चरण। केले समायाचन विनम्र होऊन। द्रविले विश्वामित्रांचे अंतःकरण। म्हणाले ते श्रीरामासी।।६२।। झाला असे खास प्रश्चाताप। असे हा क्षमा करण्यास योग्य। मी केली असे क्षमा त्यास। तू ही त्यासी करावी क्षमा।।६३।। विश्वामित्राचे ऐकून वचन। झाले शांत प्रभुश्रीराम। उतरविला बाण धनुष्यातून। ठेवला त्याने आपुल्या भात्यात।।६४।। झाले सकल बहुसंतुष्ट। झाले गुरु आज्ञेचे पालन। झाले काशीराजाचे प्राणरक्षण। झाला विजयी रामभक्त हनुमान।।६५।। हनुमान स्वयंची चिरंजीव। युगानुयुगे तो पृथ्वीतलावर। श्रीराम कथेचा प्रचार - प्रसार। श्रीरामभक्तांसी देतसे तो वरदान।।६६।। कथा ऐसी द्वापार युगातील। केले मारुतीने भीमाचे गर्वहरण। सांगतो संक्षिप्त तुम्हा लागोन। ऐकावी जेणे होईल क्षेम।।६७।। अर्जुनास भेटण्या कारण। द्रौपदीसह गेले भीम उत्तरखंड। द्रौपदीस मिळाले सुगंधी कमळ। झाली ती

त्या सुगंधे मोहीत।।६८।। मागितले तिने तैसेची कमळ। आणण्यास्तव निघाला भीमसेन। मार्गी होते गन्धमाधन शिखर। केला प्रवेश तेथील कदलीवनात।।६९।। त्यावनी राहत होत हनुमान। जाणले त्यांनी हा भीमसेन। न करणे या मार्गे स्वर्गारोहण। नसे हा मार्ग मानवांसाठी।।७०।। म्हणून एका सान पायवाटेवर। बसले हनुमान पुच्छ पसरुन। भीमाने पाहीले हनुमान। न ओळखले तयाने मारुतीस।।७१।। म्हणे का अडविलात माझा मार्ग। व्हावे दूर तुम्ही मार्गातून। मारुतीने सांगितले भीमसेनास। या मार्गाने आपण जाऊ नये।।७२।। परी भीमास मनी गर्व फार। म्हणे बाजुला व्हा सत्वर। मग मारुती म्हणे तयास। असे मी रोगी आणि वृध्द।।७३।। करा तुम्हीच मम शेपूट बाजुला। आणि जावे आपुले मार्गाला। भीम एकहस्ते उचलू पाहे शेपटाला। परी न उचले ते तयासी।।७४।। दोन्ही हस्ते लावीला जोर। परी शेपूट न हले तीळभर। समजला भीमसेन मग मनात। नसे हा कोणी सामान्य वानर।।७५।। विनम्रपणे त्याची क्षमा मागून। विचारी भीमसेन परीचय। हनुमंते सांगितला परीचय। भीमसेनाने केला त्यास प्रणाम।।७६।। भीमसेनाच्या आग्रहा खातर। दाविले हनुमन्ते दिव्य स्वरुप। पाहुन भीमसेन झाला भयभीत। म्हणे यावे आपण मूळ स्वरुपी।।७७।। प्रसन्न हनुमानाने दिला वर। महायुध्दात होईन सहाय्य। तुम्हासवे करुन गर्जना भयंकर। करीन भयभीत शत्रुसैन्य।।७८।।

देऊन भीमासी आशीर्वचन। झाले हनुमान अंतर्धान। ऐसेची केले अर्जुनाचे गर्वहरण। त्याची कथा ऐसी असे।।७९।। अर्जुन करुन रामेश्वरस्नान। होता तिथेच गर्वे विचरत। सहसा पाहीले त्याने मारुतीस। म्हणे तुमचा परीचय द्यावा।।८०।। देता हनुमंताने परीचय आपुला। रामसेतुचा त्याने उल्लेख केला। ऐकुन अर्जुन म्हणाला त्याला। श्रीरामे व्यर्थ कष्टविले सर्वांसी।।८१।। श्रीरामाने करायचा बाणानेच सेतू। हनुमंत म्हणे तो नसे मजबूत। मग लागली त्या दोघांत पैज। अर्जुनाने बाणाने केला सेतू।।८२।। कोसळला सेतू अंग न लाविता। अर्जुन अग्निप्रवेश करु लागला। ब्राह्मण वेषात श्रीकृष्ण आला। फिरुन लावली पैज त्याने।।८३।। आता हरला श्रीहनुमान। हनुमंताने ओळखले श्रीकृष्णास। श्रीकृष्ण चरण धरी हनुमान। श्रीकृष्णाने आलिंगन दिले त्यास।।८४।। श्रीकृष्णाज्ञेने चक्र गेले निघून। सेतू सागरात झाला विलीन। राहती मारुती अर्जुन ध्वजावर। झाला अर्जुन कपिध्वज।।८५।। गरुडास होता स्वत: विषयी गर्व। चक्रास आपुल्या शक्तिचा अभिमान। सत्यभामेस होता रुपाचा गर्व। केले गर्वहरण हनुमंता कडून।।८६।। श्रीकृष्णाज्ञे आले हनुमान। करु लागले वाटिका उध्वस्त। आला गरुड तयासी बांधण्यास। हनुमंते त्यास समुद्री फेकीले।।८७।। गेला हनुमंत मलयपर्वतावर। श्रीकृष्णाने पाठविले मग गरुडास। सांगितले द्वारकेत बोलावती श्रीराम। त्वरीत आपण यावे भेटीस।।८८।।

निघाला परत गरुड घेऊन झेप। हनुमान तेथुन निघाले तुरंत। राजद्वारी अडवी त्यास सुदर्शन। मारुतीने धरीले त्यास मुखात।।८९।। श्रीकृष्णाने सांगितले सत्यभामेस। बैसावे घेऊनी सीतेचे रुप। तेथे आला हनुमान तितुक्यात। श्रीरामचरणी केला प्रणाम।।९०।। पाहुनी एकाग्रदृष्टी श्रीरामासी। हनुमंताने पूसीले तयासी। आज माता असे कोठे गेली। दासीस हे स्थान का दिधलेसी।।९१।। ऐकून सत्यभामा झाली लज्जित। तितुक्यात गरुड आला तेथ। पाहुनी आधीच पोहोचले हनुमान। झाले गरुडाचे गर्वहरण।।९२।। श्रीरामाने पूसीले मारुतीस। केलात तुम्ही राजगृह प्रवेश। न अडविले कुणी दारी तुम्हास। हनुमंताने मुखातून काढले सुदर्शन।।९३।। म्हणे याने वाट अडविली म्हणून। होत होता दर्शनास विलम्ब। दिले यासी मी मुखात ठेवून। आणि आलो मी राजगृहात।।९४।। केले तिघांचे गर्वापहरण। मग हनुमंताने केले प्रभुस वंदन। गेला मलयाचली तो निघून। होता हनुमंत आज्ञाधारी भक्त।।९५।। शनिसही होता गर्व फार। हनुमंते पुच्छे तयासी गुंडाळून। केले त्याचेही गर्वापहरण। झाला शनि बहु पीडीत।।९६।। शनिला त्याच्या क्षतांवर लावण्यास। दिधले हनुमंताने त्यासी तेल। तेंव्हापासून शनीस तेल प्रिय। भक्त नित्य वाहती तेल शनिस।।९७।। मारुतीने सांगितले शनीस। न पीडावे तू मम भक्तांस। न त्रासावे तू माझ्या राशीस। नाहीतर शिक्षा करीन तुजसी।।९८।। शनिदेवाने

केला मारुतीस प्रणाम। म्हणे जे भक्त घेतील तुझे नाम। तयांसी मी कधी न गांजीन। नाही त्रासणार तुझ्या भक्तांसी।।९९।। आंजनेय असती सामर्थ्यसंपन्न। असती ते साक्षात दया निधान। करती रामभक्तांचे सारे प्रिय। मुखी सदैव असे श्रीरामनाम।।१००।। ऐकण्या रामकथा रामसंकीर्तन। विचरती हनुमान पृथ्वीवर। तैसेची भक्तांचे करण्या कार्य। असती मारुती सदैव तप्तर।।१०१।। मारुतीची कथा त्याची भक्ती। श्रीमारुतीची बुध्दी त्याची शक्ती। वर्णिण्यास दिधली त्यानेच मती। मारुती चरणी असे माझे वंदन।।१०२।।

श्रीमारुतीदेवता चरणार्पणमस्तु। श्रीस्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

## ।।ब्रह्मांडनायक अध्याय।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री व्यंकटेशाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

मारुतीराया तव कथा सुंदर। भोळा भक्तिभाव तव मधुर। नाम तव उच्चारिता मनमयूर। होई प्रसन्न खरोखर।।१।। तू रामाचा दास रामभक्त। आम्ही तव चरणीचे सेवक। घडविशी तूची रामदर्शन। असे राम प्रसन्न तुजवरी।।२।। संत तुलसीदास चरणी वंदन। होते ते रामभक्त परम। 'रामचरितमानस' ग्रंथ निर्माण। केला त्यांनी सर्वांसाठी।।३।। रामभक्त हनुमन्ताचे चरण। सदा सेवितसे हा संत। लिहीली साठीका मारुती स्तुतीपर। 'बजरंगबली हनुमान साठिका' नाम।।४।। असे हा ग्रंथ प्रसादिक। सामान्य जीवनात असे वरद। शनिचे अमंगळ परिणाम। न भोगावे लागती वाचकांसी।।५।। मकर, कुंभ असती शनिराशी। त्यांचे स्थानानुसार फल देती। हनुमान कृपा असता पाठीशी। फक्त शुभफळेच देतसे शनी।।६।। साठिकेचे दोहे असती साठ। राशीनुसार कोणते फलदायक। कारण शनिग्रहाचे परिणाम। स्थानाप्रमाणे लाभत असती।।७।। सांगती स्वतः स्वामी समर्थ। करावे नित्य साठीकेचे

पठण। राशीप्रमाणे फलदायक। कोणते दोहे ते स्वामी सांगती।।८।। असे मेष राशी जयांची। तयांचे दशम एकादश स्थानी। असती मकर अन कुंभ राशी। स्थाने ही कर्म अन लाभाची।।९।। वाचावे त्यांनी दोहे पहिले पाच। मिळतील शुभ फळे निश्चित। येऊन कर्मास वेग लाभेल। समृध्दी आयुरारोग्य संपन्नता।।१०।। तैसेची सांगतो वृषभ राशीसाठी। वाचावे दोहे सहा ते दहा त्यांनी। असती मकर कुंभ राशी। तयांच्या नवम दशम स्थानी।।११।। भाग्य, कर्माची ही स्थान। घ्यावे मारुतीस करुन प्रसन्न। साठीकेतील पाच दोहयांचे वाचन। उज्ज्वल भाग्य अन् कर्मासाठी।।१२।। मिथुन राशी पासूनी। अष्टम आणि नवम स्थानी। असती मकर कुंभ राशी। राशीस्वामीचा पडतसे प्रभाव।।१३।। स्थावर भाग्य लाभ मंद। मंद ग्रहाचा असे परिणाम। तया मिळण्या गती शीघ्र। वाचा अकरा ते पंधरा दोहे पाच।।१४।। होऊनी शीघ्र गती शनी। देईल तो शुभफळे जीवनी। मारुतीचा धाक मानी। शनिग्रह हा सर्वदा।।१५।। कर्क राशीसाठी सांगतो फल। वाचावी साठिका किमर्थ। स्थानी त्यांच्या सप्तम अष्टम। असती मकर कुंभराशी।।१६।। कौटुंबिक सुख लाभाची स्थाने। लाभण्या त्यांची उत्तम फळे। साठिकेचे सोळा ते वीस दोहे। वाचावे त्यांनी नित्यनेमे।।१७।। सिंह रास ही सूर्याची राशी। तिच्या षष्ठ सप्तम स्थानी। असती मकर कुंभ राशी। फळे त्यांची देतसे शनी।।१८।। आरोग्य,

धन, कुटुंब सुखास्तव। वाचा दोहे एकवीस ते पंचवीस। नोकरीत प्राप्त होईल सुख। लाभेल सौख्य जीवनात

।।१९।। कन्या राशीचा स्वामी बुध। असे तयांसी बुध्दिचातुर्य। स्थाने पंचम आणि षष्ठम। असती शनीग्रहाचे आधीन।।२०।। लाभण्या उद्योगात बरकत। संसारात संतती सौख्य। जोडीदाराची मिळण्या साथ। सव्वीस ते तीस फलदायक।।२१।। तुळाराशीचे चतुर्थ पंचम स्थानी। मकर कुंभ राशी असती। लाभण्या मातृसौख्य अन संतती। असावी मारुतीची साथ।।२२।। आपुला वेग करुनी प्रदान। करील मारुती सुखीजीवन। करण्या तयासी अति प्रसन्न। वाचा दोहे एकतीस ते पस्तीस।।२३।। वृश्चिक राशीचा स्वामी मंगळ। असे हा ग्रह संतापी शीघ्र। वृश्चिका सम मारुनी डंख। घेई ओढवून वैरत्व।।२४।। या राशीचे तृतीय चतुर्थ स्थान। असती शनिच्या राशी तेथ। बंधु सुख मातृसुखास्तव। वाचावे दोहे छत्तीस ते चाळीस।।२५।। धनुराशीचा स्वामी असे गुरु। शनिही देई त्यासी सन्मानु। परी गर्वाचा होता संचारु। दाखवी शनी प्रताप आपुला।।२६।। ठेवण्या शनिस बहु प्रसन्न। वाचावे त्याने दोहे पाच। एक्केचाळीस ते पंचेचाळीस। होती सुखकारक तयांसी।।२७।। मकरराशी तर शनिची रास। असे शनी स्वामी स्थानास। त्याचे प्रथम द्वितीय स्थानास। असती मकर कुंभ राशी।।२८।। देती धन

परी बहुत खर्च। न राही ठायी काहीच शिल्लक। उत्तम आरोग्य परी सदा किरकिर। वाचावे दोहे सेहेचाळीस ते पन्नास।।२९।। कुंभरास शनिचीच रास। असती जातक बहु बुध्दिवंत। तेज बुध्दिचे असे प्रखर। असे विचारयुक्त वर्तन।।३०।। परी यांचे प्रथम द्वादश स्थान। असे तेथे कुंभ, मकर रास। शनि असे प्रसन्न तयास। परी कामाची गती करी मंद।।३१।। मंदाची गती असेच मंद। करण्या शनिस शीघ्र फलदायक। दोहे एक्कावन्न ते पंचावन्न। वाचावे त्याने भक्तीने नित्य।।३२।। मीन रास ही बारावी रास। असे गुरुची प्रिय ही रास। असती जातक शांत खास। शुध्द विचार असे त्यांसी।।३३।। परी मिळण्या उत्तम आरोग्य। लाभण्या तीर्थस्थान प्रवास। होण्या धर्मकार्य जीवनात। असावा शनिचा आशीर्वाद।।३४।। त्यास्तव वाचावे जातकाने। छप्पन्न ते साठ दोहे। होऊनी शनि कृपांवत तेणे। होईल जीवन सुख समुध्द।।३५।। हनुमान साठिकेचे करा वाचन। तेणे होती मारुती प्रसन्न। त्याचे प्रसादे श्रीराम दर्शन। लाभेल जीवनी सर्वांसी।।३६।। करावे नित्यनेमे पठन। असे चीरंजीव हनुमान। धरी द्रोणपर्वत अंगुलीवर। ऐसा सामर्थ्य संपन्न मारुती।।३७।। मारुतीराया तू चिरंजीव। असती परी तुझे अंशावतार। ऐसाची एक अवतार थोर। कलीयुगामाजी असे प्रसिध्द।।३८।। संतांची भूमी महाराष्ट्र देश। अनेक संत अवतरले येथ। ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ। तुकाराम आणि

रामदास।।३९।। मिटवूनी जनांतील भेदाभेद। भेदूनी येथील पाखंडमत। मांडीले संतांनी विचार थोर। सर्व स्तरातून जाहले संत।।४०।। आले परचक्र भारत भूमिवर। मांडीला त्यांनी हाहाकार। तेंव्हा करुनी अंशरुप धारण। झालासी प्रकट रामदास रुपे।।४१।। केले रामदासांनी भारतभ्रमण। मोंगलांचे अत्याचार पाहून। द्रविले रामदासांचे अंतःकरण। म्हणती असे येथे तेज लोपले।।४२।। करुनी प्रज्वलीत मनीचे तेज। मांडीला त्यांनी कर्मयोग विचार। आधी प्रपंच करुनी नेट। करावा परमार्थ प्रपंचातूनी।।४३।। महाराष्ट्रात झाला शिवाजी नृप। माता जिजाई तेजस्वी पवित्र। जाणून कर्तुत्ववान असे स्वपुत्र। मांडीले स्वप्न हिन्दु स्वराज्याचे।।४४।। घेता शहाजीही रामदास भेट। सांगती तयांसी आपुला विचार। केले रामदासांनी त्यांना सहाय्य। दिला शिवाजीसी वरदहस्त।।४५।। झाले होते सामान्यजन तेजोहीन। गेले होते विसरुन स्वपराक्रम। जागविण्या त्यांचे बलबुध्दिसागर। केले स्थापन अकरा मारुती।।४६।। कराड प्रांतातील गाव शहापूर। केला पहिला मारुती स्थापन। असे येथील मूर्ती पूर्वाभिमुख। म्हणती यास चुन्याचा मारुती।।४७।। सात फुटांची मूर्ती सुंदर। असे पितळी उत्सवमूर्ती समोर। दिसते मूर्ती थोडीशी उग्र। मस्तकी असे गोंडयाची टोपी।।४८।। उंब्रज समीप असे मसूर। केला येथे दुसरा मारुती स्थापन। मूर्ती चुन्याची पूर्वाभिमुख।असे मूर्ती सौम्य अन

प्रसन्न।।४९।। मस्तकी मुकूट गळयात माळ। जानवं अन मेखला कमरेस। पायातळी जंबुमुखी राक्षस। मुर्तीचे बाजूस शिवराम अन समर्थ चित्र।।५०।। चाफळ येथे राममंदिरा समोर। उभा असे मारुती हात जोडून। चुना वाळू या पासूनी निर्मित। सहा फूट उंची असे मूर्तीची।।५१।। उभा रामासम्मुख हात जोडून। नेत्र त्याचे रामचरणी स्थीर। मूर्तीत दास्यत्वाचे भाव संपूर्ण। म्हणती यास दासमारुती।।५२।। याच राम मंदिराच्या पाठीमागे। आणखी एक मारुतीमंदिर असे। भीमरुपी स्तोत्रतील मारुती दिसे। या मूर्तीच्या रुपात प्रत्यक्ष।।५३।। कमरेस असे सोन्याची कासोटी। किणकिणत घंटा नेटकी मूर्ती। नेत्रांतूनी अग्निवर्षाव करी। पायतळी दैत्य वीर मारुतीच्या।।५४।। चाफळ नजीक शिंगणवाडी टेकडी। केली स्थापन सुबक सानमूर्ती। म्हणती या चाफळचा तिसरा मारुती। चार फूटी मूर्ती उत्तराभिमुखी।।५५।। वामहस्ती असे ध्वज मूर्तीच्या। असे सर्वात लहान मारुती हा। कळस देवळास तांबडया रंगाचा। हा बालमारुती अन् खडीचा मारुती।।५६।। चाफळ नजदीक माजगाव। दिले पाषाणास मारुतीचे रुप। असे पाच फुटाची मूर्ती येथ। मुख तियेचे राममंदिराकडे।।५७।। सांगलीतील वाळवे तालुक्यात। असे बहे बोरगाव येथ। केला येथे मारुती स्थापन। असे यास संदर्भ रामायणाचा।।५८।। अयोध्येस परत जाता रामानी। केला मुक्काम बोरगाव ग्रामी। श्रीराम करीत

होते संध्यास्नान। आला कृष्णेस पूर तेंव्हा।।५९।। मारुतीने उभे राहून तेथे। कृष्णेच्या प्रवाहास हस्ते अडविले। तेणे प्रवाह विभक्त झाले। झाले बहे नाम बेट तेंव्हा।।६०।। समर्थांना येथे दर्शन झाले नाही। मारली त्यांनी डोहात उडी। मारुतीमूर्ती हाती लागली। केली स्थापना त्या मूर्तीची।।६१।। पाहता मूर्तीचे हात दोन्ही। दोन मांडयांच्या बाजूस असती। असे ही भव्य दिव्य मूर्ती। म्हणती बहे बोरगावचा मारुती।।६२।। कोल्हापूर जिल्हयात मानपडाळे येथे। मारुती स्थापन केला येथे। पाच फूट उंची सुबक उत्तराभिमुख। मूर्ती जवळ दिसते उंच कुबडी।।६३।। सांगली जिल्हयात बत्तीस शिराळे। नागांसाठी प्रसिध्द असे जे। एस्. टि. स्टण्डजवळ तेथे। समर्थ स्थापित मारुती मंदिर असे।।६४।। चुन्याने सात फूट मूर्ती बनविली। असे उत्तराभिमुख मारुती। कटीवस्त्रास त्याच्या गोंडा सुंदर। कंबर पट्टयात याचे असे घंटा।।६५।। कराड कोल्हापूर मार्गी पारगाव। असे शेवटचा मारुती येथ। सर्वात सान दगडावर रेखीव। असे दीडफूट मूर्ती येथे।।६६।। ऐसे गावोगावी स्थापून मारुती। समर्थ तरुणांस प्रेरणा देती। वीरत्त्व त्यांचे जागृत करोनी। केले तयार मावळे शिवसैन्यासाठी।।६७।। असाच आणि एक अवतार। जाहला विसाव्या शतकात। निमकरोली बाबा त्यांचे नाम। हनुमंताचा अंशावतार।।६८।। सन एकोणीसशे मध्ये जन्म। जाहला उत्तर हिन्दुस्थानात। फिरोदाबाद समीप

अकबरपूर। ब्राह्मण परिवारी झाला जन्म।।६९।। पिता दुर्गादास शर्मा नाम। त्याचा सुत लक्ष्मणप्रसाद। दुर्गादास शर्मांसी वाटे मोद। पाहता पुत्राचे कौतुक।।७०।। येती जनसमुदाय बहुत। पाहण्या छोटया लक्ष्मणप्रसादास। अकरावे वर्षी सोडून गृहास। लक्ष्मणप्रसाद गुजरातेत आला।।७१।। तेथे केली तपश्चर्या बहुत। झाल्या त्यास सिध्दी प्राप्त। न गुंतला परी सिध्दी मोहात। मनाने पूर्ण विरक्त असे जो।।७२।। होता बहुजनप्रिय हा बाबा। वाटे लोकांना हा आनंद ठेवा। केला प्रसाद हनुमान भक्तीचा। उभारली अनेक हनुमानमंदिरे।।७३।। अनेक नामे तयाची असती। तिकोनी बाबा त्यास म्हणती। चमत्कारी बाबा कोणी म्हणती। नाव पडले निमकरोली बाबा।।७४।। असे तयाची कथा सुंदर। करितो आपणास निवेदन। करती बाबा भारत भ्रमण। नसे द्रव्य नसे त्याचा मोह।।७५।। एके दिनीची सांगतो मात। बाबा रेल्वेने होते जात। बैसले ते प्रथमवर्ग डब्यात। आला तिकिट तपासनीस तेथे।।७६।। पूसीले बाबांसी त्याने तिकीट। बाबा म्हणती नसे मजकडे तिकीट। थांबवूनी गाडी उतरविले त्यांस। उतरले गाडीतून बाबा तिथे।।७७।। निघाली मग गाडी पुढती। परी सुरुच होईना ना गाडी ती। चालकाने केले प्रयत्न अती। परी गाडी सुरु होईचना।।७८।। आला चालक अन तपासनीस। बोलू लागले ते एकमेकांस। म्हणती आपण उतरविले बाबांस। पाहू या कोठे असती

बाबा।।७९।। आले शोधत बाबांपाशी। करती विनंती ते बाबांसी। म्हणाले चलावे तुम्ही गाडीतूनी। बाबा देती त्यांस नकार।।८०।। केली तयांनी खूप विनवणी। आमचे अपराध क्षमा करुनी। चलावे बाबा आता तुम्ही। म्हणाले मग बाबा तयांसी।।८१।। असती माझ्या दोन शर्ती। जरी मान्य कराल तुम्ही। तरीच मानीन तुमची विनंती। म्हणती ते सांगाव्या जी।।८२।। पहिली शर्त असे तुम्हासी। न त्रासावे कधी साधुजनांसी। तैसेची येथे उतरविले मजसी। द्यावा थांबा येथे गाडीसी।।८३।। केल्या मान्य बाबांच्या शर्ती। त्या गावाचे नाव निमकरोली। झाले स्टेशन ते वाटेवरती। बाबांचे नाव पडले निमकरोली बाबा।।८४।। बाबांची शिकवण सारे मानती। चोर डाकूही त्यांना शरण येती। मोठे मोठे पदस्थ बाबांस नमिती। परदेशातही होते त्यांचे भक्त।।८५।। सांगती बाबांची ऐसी माहिती। होते बाबांचे भक्त रामदास नामी। मूळ नाम होते रीचर्ड स्टीफन। होते ते परमभक्त बाबांचे।।८६।। अमेरीकेत हॉवर्ड विद्यापीठात। होते रीचर्ड प्रसिध्द प्राध्यापक। नव्हती तयांसी तसा विश्वास। परी राहीले बाबांकडे एकरात्र।।८७।। रात्रीच्या चांदण्या होते ते पाहात। डोळयांतून त्यांचे अश्रु वाहात। म्हणाले बाबा मग तयांस। तुमचे दु:ख काय ते मी जाणतो।।८८।। निरखता तुम्ही या चांदण्यास। आठवता तुम्ही स्वमातेस। कॅन्सर व्याधीने तिचा देहांत। होता झाला हे सत्य असे।।८९।। ऐकूनी

बाबांचे ऐसे वचन। धरीले तयांनी बाबांचे चरण। म्हणे असे मी तुम्हास शरण। आपण फार थोर आहात।।९०।। रीचर्डला वाटले बहु आश्चर्य। पाहून बाबांचे अलौकिक सामर्थ्य। बाबांपुढे झाले नतमस्तक। झाले शिष्य निमकरेली बाबांचे।।९१।। होते बाबा हनुमानभक्त। झाले रीचर्ड बाबांचे भक्त। स्वीकारुनी बाबांचे तत्त्वज्ञान। केला त्याचा प्रचार अन् प्रसार।।९२।। ऐसेच स्टीव्हजॉर्ज झाले बाबाभक्त। लाभले नाम त्यांना बाबा हरिदास। Be Here Now नामे पुस्तक। लिहीले बाबा हरिदासाने।।९३।। निमकरोली बाबांनी केले कार्य। निर्मिली तयांनी हनुमान मंदिर। तैसेची निर्मिली स्थाने दोन। वृंदावन अन दुजे कैची धाम।। ९४।। सन १९६४ निमकरोली। बाबांनी भक्तीभावे स्थापना केली। मोठया हनुमान मंदिराची। असे बहु प्रसिध्द असे ते मंदिर।।९५।। भक्तियोग ज्ञानयोग प्रसार। केला बाबांनी निरंतर। सन १९७३ मध्ये ११ सप्टेंबर। रोजी देह ठेवला बाबांनी।।९६।। अजुनही अमेरिकादि देशांत। शिकविले जाते त्यांचे तत्त्वज्ञान। ऐसे होते निमकरोली बाबा थोर। साष्टांग नमस्कार त्यांचे चरणी।।९७।। मारुतीराया तव पराक्रम थोर। भक्ति अन् बलबुध्दिचा तू सागर। अशक्य वर्णिणे ते शब्दांतून। स्वामीकृपे साकारिले संक्षिप्त।।९८।। या परमभक्ताची असे विनंती। वाचता ऐकता ही मारुती नवशती। त्यांच्या मनोरथांची करुनी पूर्ती। करावे धन्य तुझिया

भक्ता।।९९।। भक्तांसी ऐसे स्वामी सांगती। वाचावी अवश्य मारुती नवशती। लाभेल तुम्हा ज्ञान, वैराग्य, भक्ती। मारुती कृपेने निश्चिती।।१००।।

श्रीमारुती देवता चरणार्पणमस्तु। श्रीस्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

हनुमानअंजनीसूनुर्वायुपुत्रो महाबलः।
रामेष्टः फाल्गुनसखः पिंगाक्षोअमितविक्रमः।।
उदधिक्रमणश्चेव सीताशोकविनाशनः।
लक्ष्मणप्राणदाता च दशग्रीवस्य दर्पहा।।
एवं द्वादश नामानि कपीन्द्रस्य महात्मनः।
स्वापकाले प्रबोधे च यात्राकाले च यः पठेत्।।
तस्य सर्वभयं नास्ति रणे च विजयी भवेत्।
राजद्वारे गह्वरे च भयं नास्ति कदाचन।।

## तुलसीदाससरचित हनुमान साठिका

जय जय जय हनुमान अडंगी। महावीर विक्रम बजरंगी।।१।।

जय कपीश जय पवन कुमार०। जय जगबन्दन सील अगारा।।२।।

जय आदित्य अमर अबिकारी। अरि मरदन जय-जय गिरधारी।।३।।

अंजनि उदर जन्म तुम लीन्हा। जय जय कार देवतन कीन्हा।।४।।

बाजे दुन्दुभि गगन गम्भीरा। सुर मन हर्ष असुर मन पीरा।।५।।

कपि के डर गढ़ लंक सकानी। छूटे बंध देवतन जानी।।६।।

ऋषि समूह निकट चलि आये। पवन तनय के पद सिर नाये।।७।।

बार-बार अस्तुति करि नाना। निर्मल नाम धरा हनुमाना।।८।।

सकल ऋषिन मिलि अस मत ठाना। दीन्ह बताय लाला फल खाना।।९।।

सुनत बचन कपि मन हर्षाना। रवि रथ उदय लाल फल जाना।।१०।।

रथ समेत कपि कीन्ह अहारा। सूर्य बिना भए अति अंधियारा।।११।।

विनय तुम्हार करै अकुलाना। तब कपीस की अस्तुति ठाना।।१२।।

सकल लोक वृतान्त सुनावा। चतुरानन तव रवि उगिलावा।।१३।।
कहा बहोरि सुनहु बलसीला। रामचन्द्र करिहैं बहु लीला।।१४।।
तब तुम उन्हकर करेहू सहाई। अबहिं बसहु कानन में जाई।।१५।।
असकहि विधि निजलोक सिधारा। मिले सखा संग पवन कुमारा।।१६।।
खेलैं खेल महा तरु तोरैं। ढेर करैं बहु पर्वत फोरैं।।१७।।
जेहि गिरी चरण देहि कपि धाई। गिरी समेत पातालहिं जाई।।१८।।
कपि सुग्रीव बालि की त्रासा। निरखति रहे राम मगु आसा।।१९।।
मिले राम तहं पवन कुमारा। अति आनन्द सप्रेम दुलारा।।२०।।
मनि मुंदरी रघुपति सों पाई। सीता खोज चले सिरु नाई।।२१।।
सतयोजन जलनिधी विस्तारा। अगम अपार देवतन हारा।।२२।।
जिमि सर गोखुर सरिस कपीसा। लांघि गये कपि कहि जगदिशा।।२३।।
सीता चरण सीस तिन्हे नाये। अजर अमर के आसिस पाये।।२४।।
रहे दनुज उपवन रखवारी। एक से एक महाभट भारी।।२५।।

तिन्हैं मारि पुनि कहेउ कपीसा। दहेउ लंक कोप्यो भुज बीसा।।२६।।
सिया बोध दै पुनि फिर आये। रामचन्द्र के पद सिर नाये।।२७।।
मेरु उपारि आप छिन माहीं। बांधे सेतु निमिष इक मांहीं।।२८।।
लछमन शक्ति लागी उर जबहीं। राम बुलाय कहा पुनि तबहीं।।२९।।
भवन समेत सुषेन लै आये। तुरत सजीवन को पुनि धाये।।३०।।
मग महं कालनेमि कहं मारा। अमित सुभट निसिचर संहारा।।३१।।
अनि संजीवन गिरी समेता। धरि दीन्हों जहं कृपा निकेता।।३२।।
फनपति केर सोक हरि लीन्हा। वर्षि सुमन सुर जय जय कीन्हा।।३३।।
अहिरावण हरि अनुज समेता। लै गयो तहां पाताल निकेता।।३४।।
जहां रहे देवि अस्थाना। दीन चहै बलि काढ़ि कृपाना।।३५।।
पवनतनय प्रभु कीन गुहारी। कटक समेत निसाचर मारी।।३६।।
रीछ कीसपति सबै बहोरी। राम लषन कीने यक ठोरी।।३७।।
सब देवतन की बन्दि छुडायो। सो कीरति मुनि नारद गाये।।३८।।

अछयकुमार दनुज बलवाना। कालकेतु कहं सब जग जाना।।३९।।
कुम्भकरण रावण का भाई। ताहि निपात कीन्ह कपिराई।।४०।।
मेघनाद पर शक्ति मारा। पवन तनय तब सो बरियारा।।४१।।
रहा तनय नारान्तक जाना। पल में हते ताहि हनुमाना।।४२।।
जहं लगि भान दनुज कर पावा। पवन तनय सब मारि नसावा।।४३।।
जय मारुती सुत जय अनुकूला। नाम कृसानु सोक सम तूला।।४४।।
जहं जीवन के संकट होई। रवि तम सम सो संकट खोई।।४५।।
बन्दि परै सुमिरै हनुमाना। संकट कटै धरै जो ध्याना।।४६।।
जाको बांध बामपद दीन्हा। मारुत सुत व्याकुल बहु कीन्हा।।४७।।
सो भुजबल का कीन कृपाला। अच्छत तुम्हें मोर यह हाला।।४८।।
आरत हरन नाम हनुमाना। सादर सुरपति कीन बखाना।।४९।।
संकट रहै न एक रती को। ध्यान धरै हनुमान जती को।।५०।।
धावहु देखि दीनता मोरी। कहौं पवनसुत जुगकर जोरी।।५१।।

कपिपति बेगि अनुग्रह करहु। आतुर आइ दुसै दुख हरहु।।५२।।
राम सपथ मैं तुमहिं सुनाया। जवन गुहार लाग सिय जाया।।५३।।
यश तुम्हार सकल जग जाना। भव बन्धन भंजन हनुमाना।।५४।।
यह बन्धन कर केतिक बाता। नाम तुम्हार जगत सुखदाता।।५५।।
करौ कृपा जय जय जग स्वामी। बार अनेक नमामि नमामि।।५६।।
भौमवार कर होम विधाना। धूप दीप नैवेद्य सुजाना।।५७।।
मंगल दायक को लौ लावे। सुन नर मुनि वांछित फल पावे।।५८।।
जयति जयति जय जय जग स्वामी। समरथ पुरुष सुअन्तरजामी।।५९।।
अंजनि तनय नाम हनुमाना। सो तुलसी के प्राण समाना।।६०।।

।दोहा।

जय कपीस सुग्रीव तुम, जय अंगद हनुमान।।
राम लषन सीता सहित, सदा करो कल्याण।।
बन्दौं हनुमत नाम यह, भौमवार परमान।।

ध्यान धरै नर निश्चय, पावै पद कल्याण।।
जो नित पढै सह साठिका, तुलसी कहैं बिचारि।
रहै न संकट ताहि को, साक्षी हैं त्रिपुरारि।।
।सवैया।
आरत बन पुकारत हौं कपिनाथ सुनो विनती मम भारी।।
अंगद औ नल - नील महाबील देव सदा बल की बलिहारी।।
जाम्बवन्त् सुग्रीव पवन - सुत दिबिद मयंद महा भटभारी।।
दुःख दोष हरो तुलसी जन - को श्री द्वादश बीरन की बलिहारी।।
गोस्वामीतुलसीदासरचित हनुमान साठिका।।

।। श्री गणेशाय नमः।।

।। हरिः ॐ।।

तं नमामि मारुतम्

हरेरंघ्रिसेव्यमान वायुदेवआत्मजम्।

अञ्जनीअर्भकं केसरीनन्दनम्।

सूर्यदेवकारणात् हनुमनामधारकम्।

तं नमामि, तं भजामि तं स्मरामि मारुतम्।

श्यामकाय अम्बुजाक्ष रामचन्द्रमीक्षितम्।

ईक्षिताक्षणेऽभवत्सः सेवकं निरन्तरम्।

वानरादिपुङ्गवं, विशालाब्धिपारगम्।

तं नमामि, तं भजामि तं स्मरामि मारुतम्।

मातासीताशोधकं राममुद्रादर्शकम्।

वाटिकादिनाशकं असुरवृन्ददण्डितम्।

रावणादिअसुरवृन्द गर्व-दर्पभञ्जकम्।
तं नमामि, तं भजामि तं स्मरामि मारुतम्।
सुवर्णलङ्कापुरिं दाहनाय कारणाम्।
पराक्रमेण उदधिलङ्घ्य चूडामणिदायकम्।
सञ्जीवनीमानितं मृत्यदर्पनाशितम्।
तं नमामि, तं भजामि तं स्मरामि मारुतम्।
कपिसङ्घनायकं विशालकीर्तिसाधकम्।
धर्ममार्गपालकं अधर्ममार्गनाशकम्।
रामपादुकाप्रियं रामनाम घोषितम्।
तं नमामि, तं भजामि तं स्मरामि मारुतम्।
तं नमामि मारुतं, तं नमामि मारुतं, तं नमामि मारुतम्।

शुभं भवतु रामात्मजः

डॉ. अरविंद रा जोशी, डोंबिवली.